Edition : XIII
Estd. June 2005

# BIOTALENT 2020-21

A step towards Excellence
Achieve - Attain - Accomplish

Dakshin Solapur Taluka Shikshan Mandal Sanchalit
(Kannada Linguistic Minority Institute)

# V. G. SHIVDARE COLLEGE OF ARTS, COMMERCE & SCIENCE, SOLAPUR





ग्राहक संरक्षण कायदा या विषयावर आयोजित वेबिनार

प्रश्नमंजुषेतील विजेत्यांसोबत प्राध्यापक वर्ग


आयआयटी दिल्ली येथे प्रेझेंटेशन साठी गेलेले विद्यार्थी

सायन्स डे साजरा करताना


इतिहास विभागातर्फे किल्ला प्रतिकृती स्पर्धा व प्रश्नमंजुषा



युवा दिनी स्वामी विवेकानंद आणि आजचा युवक या विषयावर आयोजित वेबिनार



ओझोन डे निमित्त उद्घाटन सोहळा



युवादिन व राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त प्रमुख पाहुणे प्रा. शिवराज पाटील यांच्यासोबत प्राचार्य व प्राध्यापक वृंद



मराठी विभागातर्फे मराठी राजभाषा दिन साजरा



शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त प्राध्यापक वृंद




रा.से.यो. विभागातर्फे संविधान दिनानिमित्त माझी ड्युटी व माझे कर्तव्य या विषयावर प्रा. तुकाराम जाधव यांचे वेबिनार



कोविड-१९ जनजागृती निमित्त नॅशनल वेबिनारचे उद्घाटन



MOU with IIMR Rabby Sorghum Centre Solapur



महिलांसाठी स्वसंरक्षणार्थ मोफत शिबीराचे आयोजन




वि.गु. शिवदारे अण्णा यांच्या जंयतीनिमित्त रक्तदान शिबीर

कोरोना जनजागृती अंतर्गत एन.एस.एस. विभागातर्फे सिध्देश्वर कॅन्सर हॉस्पीटल मधील कोविड लसीकरण सेंटरला भेट










संविधान दिन




स्वातंत्र्य दिन



डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त प्राध्यापक वृंद




भिक्षामुक्ती अभियान रॅली



वसुंधरा दिनानिमित्त वृक्षारोपण



अंतर्गत तक्रार निवारण समिती आणि
प्रथमेश स्पोर्टस क्लब यांच्यातील
अंतर्गत सामंजस्य करार (MOU)



शिक्षकेतर कर्मचारी वृंद



सोशल डिस्टन्सींग चे महत्व



कु. प्रणाली तांदळे, बी.कॉम. भाग-२



कु. साक्षी देशपांडे, बी.एस्सी.भाग-३

# संस्थापक चेअरमन



## कै. वि.मु. शिवदारे अण्णा

समाजकारण, सहकार, राजकारण व शिक्षण
यातील आपला सहवास
करुन गेला दीन दलितांचा उध्दार खास

ज्ञानाची रोवून मशाल या वाळवंटावर
दाटली आता वनराई या खडकावर

त्रिकालात अजरामर ठरो तुमची कीर्ती
प्रिती जागो पाहुनी तुमची मूर्ती



## अध्यक्ष



# मा.श्री. राजशेखर वि. शिवदारे

कार्य हीच उपासना



**Dr. B. N. Kamble - Principal**

# Principal Desk

I am very honored and privileged to present our annual college magazine "Biotalent" for the Academic year 2020-21, showcasing the extraordinary talent and skills of our students. Despite the challenges faced by our students due to the pandemic, they have enthusiastically participated and excelled at their curricular as well as extracurricular pursuits.

Our College was established in the year 2005 by the great freedom fighter and philosopher Hon. Late Shri. V. G. Shivdare with a vision to provide quality education to rural, semi-rural and economically deprived. I believe our staff members and students try to uphold that mission every day and work extremely hard to make that vision come true under the guidance of our Chairman Hon. Shri R. V. Shivdare. At V. G. Shivdare College of Arts, Commerce and Science, we believe that education should not be limited to the curriculum of students. We encourage and support our students to excel not only in their chosen professional field but also learn and develop new skills and hobbies to become well rounded global citizens. Due to the continued quality education provided by our institute for many years, we were able to fill all the admission seats available, at the very onset of this academic year for most of our courses. In fact, due to the increased demand for admission we had to expand our admission capacity of our PG Biotechnology course. Having done that for the first time, it was very challenging to maintain the same quality of education in this pandemic situations of COVID 19. To this end our staff have relentlessly worked over the past year to provide students with various opportunities to elevate their skills and knowledge. With the challenging pandemic situations, the faculty members quickly adapted to the need of online mode of teaching-learning platform and have efficiently executed the curriculum. I am very proud to say that along with the regular curriculum, we have conducted over 20 webinars, workshops and relevant events offline and online in the past academic year on various topics of importance for students and society. Some important mentions include Health Safety and Role of Biotechnology to Combat COVID -19, Disaster Management, Metagenomics, Research Article and Review Writing Skills, Polymerase Chain Reaction, Career Opportunities in Biotechnology etc. We have been able to efficiently utilize the online platform and for the first time to organize an international webinar on 'New Frontiers and Opportunities in Biotechnology', which has been a new milestone for us. In addition, it is remarkable to mention that our staff have also worked on field for the awareness of COVID vaccination program under our NSS team. We have also encouraged research by establishing additional certification courses and by collaborating through MOU with national and international institutions to make sure that students are exposed to the most current and relevant knowledge, technology and research from around the world.

On the other hand, I am extremely proud of our students who have bravely become COVID front line warriors and have provided valuable assistance to COVID testing laboratories in Solapur. Our students have worked extremely hard to overcome challenges and get jobs and internship positions all over the country. Students at our college have shown a brilliant performance in their exams and have also shined by clearing the tough PG entrance exams like IIT-JAM, JNU at national level. Despite the online mode of communication, we have provided students with a platform to express their artistic sides by holding poster, photography and speech competitions and have celebrated the heritage of our country by celebrating people from our history.

The challenging conditions in this academic year have taught many things as well as introduced many relevant changes in classical way of teaching learning and curriculum implementation. With the kind of efforts and enthusiasm our students and staff have shown, I am very sure that we could efficiently adapt to such challenging scenarios with confidence as a need of time. I would like to thank my students and staff for all their support in this past year and wish them the best for the future endeavors.

# अभिनंदन



Dr. Valasange A.B.
Biotechnology
Ph.D. in Anti-inflammatory activity of some medicinal plant extracts on Albino mice.



Dr. Anita Birajdar
Economics
Ph.d. in a Study of Grampanchayat Budget Analysis in Solapur District



चि. विनायक म्हेत्रे
**IIT JAM 2021**



कु. प्राजक्ता गायकवाड
**Qualified JNU Exam**



कु. धनश्री मुरगुरे
मराठी विभागात विद्यापीठ स्तरावर
सुवर्ण पदक विजेती

Issue: XIII Estd.: June 2005

A step towards Excellence
Achieve - Attain - Accomplish
AT
Dakshin Solapur Taluka Shikshan Mandal Sanchalit
(Kannada Linguistic Minority Institute)

# V. G. SHIVDARE COLLEGE OF ARTS, COMMERCE & SCIENCE, SOLAPUR

# BIOTALENT
# 2020-21

**Dr. B. N. Kamble**
Principal

**Miss. Varade V. K.**
Editor

**Magazine Committee Member**

- Prof. Bavage S. J.
- Prof. Shivpuje S. P.
- Prof. Metkari S. B.
- Prof. Kamble A. A.
- Prof. Manure V. S.
- Prof. Birajdar A. L.
- Mr. Habbu S. P.
- Prof. Gopika Manjunath
- Prof. Ghongade S. S.
- Prof. Dr. Aadki V. S.
- Prof. Dr. Dhanave R. S.
- Prof. Gote L. R.
- Mr. Swami M. S.
- Mr. Kachare A. A.

# व्ही.जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अॅंड सायन्स, सोलापूर

## संचालक मंडळ

| | |
|---|---|
| मा. श्री. राजशेखर वि. शिवदारे | अध्यक्ष |
| मा. श्री. उल्हास मल्लिकार्जुन पाटील | सदस्य |
| मा. डॉ. श्री. व्ही. एस. मेतन | सदस्य |
| मा. श्री. एस. डी. येळेगांवकर | सदस्य |
| मा. श्री. मल्लिकार्जुन गं. विभुते | सदस्य |
| मा. प्राचार्य डॉ. बी. एन. कांबळे | सदस्य |

## स्थानिक व्यवस्थापन समिती

| | |
|---|---|
| श्री. राजशेखर वि. शिवदारे | अध्यक्ष |
| श्री. उल्हास मल्लिकार्जुन पाटील | सदस्य |
| श्री. महादेव जगदेवप्पा पाटील | सदस्य |
| श्री. बी.एस. कुलकर्णी | सदस्य |
| मा. प्राचार्य डॉ. बी. एन. कांबळे | सदस्य-सचिव |
| सौ. गोपिका मंजुनाथ | शिक्षक-प्रतिनिधी |
| सौ. एस.जे. बावगे-ब्याळे | शिक्षक-प्रतिनिधी |
| सौ. व्ही.के. वराडे-हडपद | शिक्षक-प्रतिनिधी |
| श्री. के.बी. तांबोळी | शिक्षकेतर-प्रतिनिधी |

# अनुक्रमणिका


| | | | | |
|---|---|---|---|---|
| | प्राचार्यांचे मनोगत | | | |
| | संपादकीय | | | १ |
| | वार्षिक अहवाल २०२०-२१ | | | २ |
| १) | बोधचिन्हांचे वैविध्य | अर्थ विषयक | मानसी गायकवाड | ९ |
| २) | व्यथा पूरग्रस्तांची | आत्मकथन | साक्षी देशपांडे | १२ |
| ३) | शिवरायांची गडकोटनिती | ऐतिहासिक | अश्विनी गोब्बूर | १५ |
| ४) | पिता | | अक्षता प्याटी | १६ |
| ५) | वाचन संस्कृतीची गरज | ललित | ऐश्वर्या मिराखोर | १७ |
| ६) | स्वच्छ भारत अभियान | पर्यावरण | अंजली मळेवाडी | २० |
| ७) | संतसाहित्य आणि आजचा तरुण | वैचारिक | ज्ञानेश्वर बंडगर | २१ |
| ८) | मराठी वाङ्मयाची समृध्द परंपरा | वैचारिक | प्रगती बनसोडे | २३ |
| ९) | सोशल मिडियाच्या विळख्यातील आजची तरुणाई | सामाजिक | काजल देवकर | २५ |
| १०) | इंडिया २०२० | पुस्तकाचे रसग्रहण | प्रणाली तांदळे | २९ |
| ११) | आत्मविश्वास : एक जीवनसाधन | ललित | विनायक म्हेत्रे | ३१ |
| १२) | कोरोना आव्हानाला सामोरे जाताना... | सामाजिक | ज्योत्सना धनवडे | ३२ |
| १३) | कविवर्य कुसुमाग्रज | व्यक्तिचित्रण | श्रुती पाटील | ३४ |
| १४) | ऑनलाईन शिक्षण व्यवस्था फायदे तोटे | सामाजिक | श्रध्दा शिंदे | ३८ |
| १५) | स्पर्धा परिक्षा - एक चक्रव्यूह | सामाजिक | भारती साबा | ३९ |
| १६) | मराठी भाषा संवर्धनाचे उपाय | वैचारिक | यश चव्हाण | ४१ |
| १७) | विज्ञान | विज्ञानविषयक | शुभम बमनळ्ळी | ४३ |
| १८) | डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम | व्यक्तिचित्रण | सबाह नाईकवाडी | ४४ |
| १९) | उगाच हरु नको | | भारती साबा | ४५ |
| २०) | प्यार करके ते देखो | | पद्मनाभ देशपांडे | ४६ |
| २१) | जीवनात काय राहिलयं? | | पद्मनाभ देशपांडे | ४७ |
| 22) | What Corona Outbreak Has Taught To World? | विज्ञानविषयक | Sagar Patil | 48 |
| 23) | The Sum of All Fears Tom Clancy's | पुस्तकाचे रसग्रहण | Vishal Jadhav | 51 |
| 24) | C. V. Raman - The Great Physicist | व्यक्तिचित्रण | Yash Chavan | 53 |
| २५) | ಆದರ್ಶ ವಿದ್ಯಾರ್ಥಿ | | रोहिणी शेरीकर | ५४ |
| २६) | {والدین کے بے مثال قربانیاں} | | नाजिया पठाण | ५५ |
| २७) | {ماں} | | नाजिया पठाण | ५६ |
| २८) | राष्ट्रीय सेवा योजना अहवाल | | प्रा. वसंत मणुरे | ६२ |

# संपादकीय



प्रा. वैशाली वराडे
संपादक

अमंत्रं अक्षरं नास्ति नास्ति मूलमनौषधम्।
अयोग्यः पुरूषो नास्ति योजकस्तत्रदुर्लभः ।।

सद्विचारांची व्यासंगता, श्रेष्ठकृतिसोबतचे साहचर्य, सद्भावना बरोबरची सहृदयता, शीलवान व्यक्ती बरोबरचे संबंध मनुष्यात प्रतिभा उत्पन्न करते. 'नवनवोन्मेशशालिनी प्रतिभा' असं प्रतिभेविषयी म्हटले जाते. ज्या ज्या ठिकाणी प्रतिभा श्रेष्ठ रुपात अवतरली त्या त्या ठिकाणी बहुजन हिताय बहुजन सुखाय लक्ष्य गाठल्याचे दिसून येते. साहित्य, संगीत, कला, क्रिडा, विज्ञान, तंत्रज्ञान अशा प्रत्येक क्षेत्रात उत्कृष्टतेचा व्यासंग हा प्रतिभेतूनच अवतरतो.

ज्ञानेश्वरांचे पसायदान, शिवाजी महाराजांची स्वराज्यनिर्मिती, बाबा आमटे यांचा आनंदाश्रम, सहकारमहर्षी कै. वि. गु. शिवदारे अण्णा यांची सामाजिक राजकीय वाटचाल प्रतिभेच्या प्रासादिकतेची साक्षच आपल्याला देतात.

अशा प्रतिभेचे मूळ महाविद्यालयीन जीवनात अंकुरीत होत असताना येणारा अनुभव विलक्षण असतो. त्याच अनुभवाचा काव्यरुप, चित्ररुप, लेखन रुपाने सजलेला बायोटॅलेंटचा हा वार्षिक अंक आपणांसमोर ठेवताना हृदय उल्हसित होत आहे.

कु. धनश्री मुरगुरे, बी.ए.भाग–३ हिला मराठी विभागात विद्यापीठ स्तरावर सुवर्ण पदक मिळणे ही घटना या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाच्या यशात मानाचा तुरा रोवणारी आहे.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. राजशेखर शिवदारे यांचे अंकाच्या जडणघडणीत नेहमीच मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एन. कांबळे यांच्या मौलिक मार्गदर्शनातूनच हा अंक पूर्णत्वास आलेला आहे. ज्यांच्या सहकार्यातून संपादकीय स्तरावर काम करणे सुलभ झाले असे माझे सर्व सहकारी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, रेणुका प्रिंटर्सचे श्री. योगीनाथ पाटील व त्यांचे सहकारी या सर्वांचे मनापासून आभार व्यक्त करताना आपणा सर्वांकडून अंकाचे सहर्ष स्वागत होईल ही आशा व्यक्त करते. धन्यवाद !

# वार्षिक अहवाल २०२० - २१

नमस्कार,

या संस्थेची उभारणी मोठ्या ध्येयाने, जिद्दीने, परिश्रमाने, दूरदृष्टीने केली ते संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जेष्ठ स्वातंत्र्यसेनानी सहकार महर्षी, शिक्षण महर्षी माजी आमदार कै. वि. गु. शिवदारे अण्णांच्या पवित्र स्मृतीला विनम्र अभिवादन करतो.व्ही. जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्सचा शैक्षणिक वर्ष २०२० - २१ चा १५ वा वार्षिक अहवाल आपणासमोर सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. कोरोनाच्या बिकट कालावधीमध्ये प्रतिकुल परिस्थितीत देखील महाविद्यालयाने प्रयत्नपूर्वक गुणवत्ता टिकविली आहे.

२०२० मध्ये झालेल्या सोलापूर विद्यापीठ परीक्षांचे निकाल जाहीर झाले. आपल्या महाविद्यालयाचा निकाल उमेद, उत्साह व आशा जागवणारा होता.

| | | |
|---|---|---|
| एम.एस्सी भाग १ :१००% | एम.एस्सी भाग २ : १००% | |
| बी.ए भाग १ : ९२% | बी..कॉम भाग १ : ९९% | बी. एस्सी भाग १ : १००% |
| बी.ए भाग २ : ९०% | बी.कॉम भाग २ : ९३% | बी.एस्सी भाग २ : १००% |
| बी. ए भाग ३ : ८३ % | बी. कॉम भाग ३ : ९९% | बी. एस्सी भाग ३ : १००% |

विद्यार्थ्यांच्या परिश्रमाला शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन मिळते आहे, याचे हे उत्तम उदाहरण आहे.

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांची एकूण संख्या इतकी आहे. त्यामध्ये बी.ए-१६३, बी..कॉम-३०७, बी.एस्सी- १७३ व एम. एस्सी. - ७६ अशी विविध विभागातील विद्यर्थ्यांची संख्या आहे. आमच्या महाविद्यालयात एकूणअधिव्याख्याते २८ आहेत. त्यापैकी सेट नेट उत्तीर्ण १३ तर एम. फील व पी.एच.डी. धारक १० आहेत.

आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने उत्कृष्ट कार्य केले आहे. कै. वि. गु. शिवदारे अण्णांच्या स्मृती समारोहानिमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरात ६३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. 'कोविड-१९ : प्रशासन व नागरिकांची भूमिका' या विषयावर वेबिनारचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी सोलापूरचे कोविड नियंत्रण कक्ष अधिकारी श्री.धनराज पांडे यांनी मार्गदर्शन केले. फीट इंडिया मोहिमेअंतर्गत 'आरोग्यम धनसंपदा' या विषयावर योगप्रशिक्षक सौ. काजल जाधव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.त्यांनी कोरोना काळात शारीरिक व मानसिक स्वास्थ्य कसे टिकवावे यासंदर्भात मार्गदर्शन केले. इंडिया टेक्नो इन्टरनॅशनल मुंबई, आयोजित 'सायबर क्राइम' या विषयावर वेबिनार आयोजित करण्यात आले. यामध्ये श्री. हरिष चंदर यांचे मार्गदर्शन लाभले. 'माझी ड्युटी माझे कर्तव्य' या विषयावर प्रा. तुकाराम जाधव यांचे संविधान दिनानिमित्त वेबिनार आयोजित करण्यात आले. स्वामी विवेकानंद जयंती, राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त 'स्वामी विवेकानंद व आजचा युवक' या विषयावर प्रा. शिवराज पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. कोरोना काळात सामाजिक जबाबदारी पार पाडण्यासाठी सोलापुरातील सिद्धेश्वर कॅन्सर हॉस्पिटल येथील कोविड सेंटरमध्ये

स्वयंसेवकांसमवेत प्राध्यापकांनी कोरोना जनजागृती उपक्रम राबविला. नियमीत कार्यक्रमांमध्ये विविध महापुरूषांच्या जयंती व पुण्यतिथी निमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षलागवड उपक्रम राबवण्यात आला. स्वच्छता अभियान राबवण्यात आले.

कॉमर्स विभागातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कंज्यूमर गाइडन्स सोसायटी ऑफ इंडिया व व्ही.जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने 'कोरोना काळातील ग्राहक वाद व वित्तीय साक्षरता' या विषयावरील वेबिनारचे आयोजन करण्यात आले. यामध्ये अँड. श्री. राजेश कोठारी, श्री. नंदकुमार मेनन यांनी मार्गदर्शन केले.जागतिक ग्राहक दिनाचे औचित्य साधून अँड. राजन दीक्षित यांचे 'ग्राहक संरक्षण कायदा २०१९' या विषयावर वेबिनारचे आयोजन करण्यात आले.

कला शाखेमध्ये विविध वाङ्मय मंडळ व अभ्यास मंडळाच्या वतीने कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. इतिहास विभागातर्फे शिवजयंती निमित्त प्रश्नमंजुषा, किल्ला प्रतिकृती तयार करणे व चित्रकला या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. मराठी विभागातर्फे विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय, टेंभुर्णी आयोजित अभ्यासक्रम व मराठी भाषा या संदर्भातील ब्रीज कोर्समध्ये विभागातील प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. 'भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. 'मराठी राजभाषा दिनानिमित्त' डॉ. दामोदर बनसोडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

संस्थेच्या व महाविद्यालयाच्या यशात जैवतंत्रज्ञान विभागाचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे. या वर्षी 'न्यू फ्रंटियर्स इन बायोटेक्नॉलॉजी' या विषयावर आंतरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन केले. या वेबिनार मध्ये डॉ. तौफजल इस्लाम (बांग्लादेश), डॉ. द्वारकिश (एन.आय.टी., कर्नाटका) आणि डॉ. रुपा सौजन्य यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. तसेच इंटरनॅशनल ओझोन डे, नॅशनल सायन्स डे, प्रश्नमंजुषा, हेल्थ सेफ्टी अँड रोल ऑफ बायोटेक्नॉलॉजी टू कॉम्बॅट कोव्हीड १९, पॉलीमरेज चेन रिअँक्शन, मेटाजिनॉमिक्स तसेच रिसर्च पेपर अँडरिव्ह्यू रायटिंग या विषयांवरील ऑनलाईन कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. तसेच यानिमित्ताने विविध स्पर्धांचे ऑनलाईन आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना संशोधन तसेच प्रशिक्षणाच्या दृष्टीने वाव मिळावा या हेतूने जैवतंत्रज्ञान विभागाने राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर, भारतीय कदन्न अनुसंधान संस्थान, सोलापूर व आधार लाईफ सायन्सेस, सोलापूर इत्यादी संस्थांसमवेत सामंजस्य करार केलेला आहे. यावर्षी राष्ट्रीय स्तरावरील सायकॅब मोहाली या संस्थेशी महाविद्यालयाचा विशेष सामंजस्य करार झालेला आहे.

जैवतंत्रज्ञान विभागाचे डॉ. अनमोल वळसंगे यांनी " Anti-inflammatory activity of some medicinal plants extracts on albino mice" या विषयावर तर डॉ. अनिता बिराजदार यांनी "A study of grampanchayat budget analysis in solapur district" या विषयावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर ची पी.एच.डी पदवी प्राप्त केली आहे. महाविद्यलयाच्या दृष्टीने गौरवाची बाब म्हणजे मराठी विभागातील कु. धनश्री मुरगुरे, बी.ए.भाग-३ या विद्यार्थिनीने विद्यापीठ स्तरावर सुवर्णपदक

प्राप्त केले. त्याचसोबत विनायक म्हेत्रे बी.एस्सी.भाग-२ **IIT JAM 2021** तर कु. प्राजक्ता गायकवाड या विद्यार्थिनीने जेएनयु परिक्षेत यश संपादन केले. महाविद्यालयातील आर्टस्, कॉमर्स, जैवतंत्रज्ञान या सर्व शाखांमधील प्राध्यापकांनी शैक्षणिक वर्षात गुणवत्ता वाढीसाठी विविध वेबिनार मध्ये सहभाग नोंदविला.

महाविद्यालयाचा आत्मा म्हणजे ग्रंथालय आहे. 'ग्रंथ हाच गुरू' म्हणून आम्ही ग्रंथालयाचा विकास करीत आहोत. महाविद्यालयीन ग्रंथालयाने DELNET (Developing Library Network) व NDL (National Digital Library) Electronic स्वरूपातील ज्ञानाचा संग्रह यामध्ये E-Journal व E-Books असे दर्जेदार ग्रंथसंग्रह आहेत. ग्रंथालयाने Digital Library d Research Cell याद्वारे महाविद्यालयीन शिक्षक व विद्यार्थी यांच्याकरिता इंटरनेट व वाय-फाय उपलब्ध करून देण्यात आले आहे. शिवाय ग्रंथालयाने Library Automation साठी E -Granthalay व Soul 2.0 Software घेतलेले आहे. ग्रंथालयातर्फे बुक बँक योजनाही राबविण्यात येत आहे. ग्रंथालयात एकूण क्रमिक पुस्तकांची संख्या ५८७० व नियतकालिकांची संख्या ३६ एवढी आहे. दैनंदिन वृत्तपत्रांची संख्या १० आहे.

कोरोना कालावधीमध्ये जनजागृती करिता प्रश्नावली, चित्रफीत, मार्गदर्शनपर वेबिनार याचे आयोजन महाविद्यालयातर्फे वेळोवेळी करण्यात आले. या बरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, व्यक्तिमत्व विकास, मुलाखत तंत्र, संभाषण कौशल्य, कँपस इंटरव्ह्यू यासारखे उपक्रम राबविले जात आहेत. प्राचार्य या नात्याने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये विविध क्षेत्रात यश संपादन केलेले विद्यार्थी व प्राध्यापकांचे अभिनंदन करून त्यांच्या वाटचालीस व परीक्षेसाठी शुभेच्छा देऊन हा अहवाल इथेच संपवतो.

धन्यवाद!!!!!

# गुणवंत विद्यार्थी

## बी. ए. भाग १



चि. संदीप पोतदार
८४.५ % प्रथम क्रमांक



कु. रेवती बागदुरे
८४ % द्वितीय क्रमांक



चि. मिहीर गायकवाड
८१. १७ % तृतीय क्रमांक

## बी. ए. भाग २



कु. वैष्णवी छत्रे
९१ % प्रथम क्रमांक



कु. भरती साबा
८६.१७ % द्वितीय क्रमांक



कु. अश्विनी गोब्बूर
८४.४० % तृतीय क्रमांक

## बी. ए. भाग 3



कु. धनश्री मरगुरे
८२.४७ % प्रथम क्रमांक



कु. वंदना पवार
८०.९१ % द्वितीय क्रमांक



चि. पंचनाथ शरणार्थी
७८.८% तृतीय क्रमांक

# गुणवंत विद्यार्थी

## बी. कॉम. भाग १



चि. अभिषेक धुळराव
८४ % प्रथम क्रमांक



चि. मनोज शिंदे
८२.५ % द्वितीय क्रमांक



चि. अक्षत गायकवाड
८१.१७% तृतीय क्रमांक

## बी. कॉम. भाग २



कु. श्वेता काळे
८१.७५ % प्रथम क्रमांक



कु. प्रतिक्षा सोनकांबळे
७९.८३ % द्वितीय क्रमांक



कु. रिजवाना शेख
७७.५८ % तृतीय क्रमांक

## बी. कॉम. भाग 3



कु. रेशमा जमादार
८१ % प्रथम क्रमांक
(विभागून)

चि. शिवशंकर बोधले
८१ % प्रथम क्रमांक
(विभागून)



कु. नंदिनी राठोड
८० % तृतीय क्रमांक
(विभागून)



कु. वैशाली ईश्वरकट्टी
८० % तृतीय क्रमांक
(विभागून)



चि. स्वप्नील रुपनर
८० % ततीय क्रमांक
(विभागून)

# गुणवंत विद्यार्थी

## बी. एस्सी. (बायोटेक) भाग १


कु. प्रियांका सालीमठ
८५.३३ % प्रथम क्रमांक


कु. मुनाझाए बिद्री
८१.१७ % द्वितीय क्रमांक


चि. अमन बागवान
८१.१७ % द्वितीय क्रमांक


कु. नुतन पिशांतोत
७६.३३ % तृतीय क्रमांक

## बी. एस्सी. (बायोटेक) भाग २


कु. वैष्णवी गायकवाड
८८.३९ % प्रथम क्रमांक


चि. विनायक म्हेत्रे
८६.८९ द्वितीय क्रमांक


कु. देवयानी लांबतुरे
८६.११ % तृतीय क्रमांक

## बी. एस्सी. (बायोटेक) भाग 3


कु. हरिप्रिया बाबू
८१.९२ % प्रथम क्रमांक


कु. सारिका लोणी
८१.८६ % द्वितीय क्रमांक


कु. विद्या राठोड
७९.९२ % तृतीय क्रमांक

# गुणवंत विद्यार्थी

## एम. एस्सी. (बायोटेक) भाग १



चि. आकाश जाधव
८०.०८ % प्रथम क्रमांक



चि. विशाल जाधव
७७.२८ % द्वितीय क्रमांक



चि. शिवशंकर चितली
७६.६४ % तृतीय क्रमांक

## एम. एस्सी. (बायोटेक) भाग २



कु. सुहासिनी हत्ताळे
८३.२८ % प्रथम क्रमांक



कु. विणा जंबगी
७८ % द्वितीय क्रमांक

कु. पद्मश्री पुजारी
७७.८ % तृतीय क्रमांक



# बोधचिन्हांचे वैविध्य

आजचं युग हे आधुनिक युगाचं आहे. या जगात अशा खूप काही नवनवीन वस्तू व गोष्टी आज आपल्याला बघावयास मिळतात. त्यातच आज सर्वात जास्त प्रभाव पाडणारा घटक म्हणजे लोगो. लोगो ह्याला मराठीत बोधचिन्ह असे म्हणतात. यावरून आपणास ते वस्तू / पदार्थ हा कोणत्या कंपनीचा आहे हे समजते. लोगो आज लोकांना आकर्षित करण्यासाठी, जाहिरातीचा व त्या लोगोचा एवढ्या जास्त प्रमाणात भडिमार केला जातो की ग्राहक हा त्या वस्तूवर मोहित होऊन ते घेण्यास भाग पडते. जगात आज मोठ्या प्रमाणात मोठमोठ्या कंपन्या कार्यरत आहेत आणि त्या प्रत्येक कंपन्यांना स्वतःचे अस्तित्व आहे असे दर्शविण्यासाठी त्या कंपन्याना लोगो दिला जातो. हा लोगो त्यांच्या कंपनीला एक प्रकारे प्रतिनिधीत्व करत असतो. त्या लोगोमधून ह्या कंपन्या आपल्या ग्राहकापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करत असतात. या लोगोमधून ते आपल्या कपंनीचे महत्त्व लोकापर्यंत पोहचवत असतात. कधी कधी तर या लोगोला लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी चित्रपटसृष्टीतील मोठ्या व प्रसिध्द अशा चेहऱ्याला घेऊन त्या लोगोचा प्रचार करत असतील किंवा जाहीरात करीत असतील तर आपण लगेच त्या लोगोवर आकर्षित होतो. असे कंपनीचे लोगो बनविण्यासाठी कंपनीवाले लाखो रुपये खर्च करतात. आपण जवळजवळ दररोजच नवनवीन कपंनीचे लोगो पाहतो. पण तुम्ही कधी असा विचार केला आहे का? की या प्रसिध्द लोगोचे अर्थ तरी काय असतात? या लोगोच्या पाठीमागे खूपचं मनोरंजक अर्थ लपलेले असतात. त्यामधील काही अर्थ खरचं खूप प्रभावी आहेत. चला तर मग जाणून घेऊया की, या प्रसिध्द लोगोंचे अर्थ काय असतात आणि त्यामधून त्यांना काय सांगायचे असते.

✲ डॉमिनोज :- डॉमिनोजच्या लोगोमधील तीन पांढऱ्या ठिपक्यांचा अर्थ माहिती आहे का? त्याच्या निर्मितीमागची कहाणी जी फार कमी लोकांना माहित आहे. आर्डर केल्यानंतर ३० मिनिटांत घरपोच पिझ्झा आणि उशीर झाल्यास तो मोफत अशी आकर्षक जाहीरातबाजी करणारी ‘डॉमिनोज’ हे नाव आपल्याला चांगलंच परिचयाचं झालं आहे. पिझ्झाची सामान्य भारतीयांना ओळख करुन दिली ती डॉमिनोज यांनीच असं म्हटलं तर चुकीचं ठरणार नाही. पिझ्झा बनविणारा हा जगातला दुसऱ्या क्रमांकाचा मोठा ब्रँड आहे. आज जगभरात डॉमिनोजची १३ हजारांहून अधिक आऊटलेटस् आहेत.

टॉम मोनॅगम आणि जेम्स मोनॅगन या दोन्ही भावंडाने १९६० च्या सुमारास पिझ्झाचं एक दुकान सुरु केलं. बघता बघता या दोन्ही भावांचा व्यवसाय चांगलाच नावारुपास आला. दोन्ही भावांची आर्थिक स्थिती सुधारु लागली, पण आलिशान कार घेण्याच्या मोहापायी जेम्स मोनॅगनने दुकानाचे हक्क आपल्या भावाला विकले आणि तो व्यवसायातून बाहेर पडला. त्यावेळी दुकानाचे नाव डॉमिनिक्स असे होते. जेम्स व्यवसायातून बाहेर पडल्यानंतरही टॉमने आपला व्यवसाय सुरुच ठेवला. पुढे डॉमिनिस्क इतकं प्रसिध्द झालंकी टॉमने आणखी दोन आऊटलेट सुरु केली. हे टॉमच्या दृष्टीने सर्वात मोठं यश होतं.

१९८३ पर्यंत डॉमिनोज पिझ्झाची १००० आऊलेटस् जगभर पसरली. डॉमिनोजसाठी आकर्षक

आणि तितकाच अर्थपूर्ण लागो तयार करण्याचा टॉम विचारात होते. तेव्हा त्यांनी तीन ठिपके असलेला लोगो तयार करुन घेतला. टॉमने पहिलं आऊटलेट भावासोबतच सुरु केलं, अल्पावधीतच एकाचे तीन पिझ्झा आऊटलेट होणं ही देखील टॉमसाठी खूपच महत्त्वाची गोष्ट होती. त्या तीन दुकानांची आठवण कायमस्वरुपी लक्षात रहावी यासाठी त्याने आपल्या लोगोवर तीन ठिपके देण्याचा निर्णय घेतला. तसेच लक्ष वेधून घेण्यासाठी त्यांनी गडद लाल, निळा व शुभ्र पांढऱ्या रंगाचाही वापर लोगोची निर्मिती करताना केला.

* ॲपल :- ॲपल लागोतील खालेल्या भागाबद्दल एक मतप्रवाह आहे की संगणक क्षेत्राचा पाया बाईटस् संकल्पनेने घातला. त्यामुळे लोगोमध्ये बाईट (चावलेला तुकडा) दाखविण्यात आला असावा पण ॲपल लोगो डिझायनर 'रॉब जेनॉफ' ह्यांनी ह्या विचारधारेचे खंडन केले.

अजून एक मतप्रवाह असा आहे की, संगणक क्षेत्रामध्ये मोलाची कामगिरी बजावून कायम दुर्लक्षित राहिलेल्या ॲपल टयुरिंग ह्याच्या स्मरणार्थ हा लोगो बनविण्यात आला. काळाच्या एक पाऊल पुढे असणारा ॲलन हा सदैव दुर्लक्षित राहिला. सायानाईड हे जहाल विष मिसळण्यात आलेल्या सफरचंदाचा तुकडा खाऊन आत्महत्या केली.

* टोयोटा :-

टोयाटोच्या लोगोमध्ये दिसणारे तीन वर्तुळ? हे तीन हृदयांचे प्रतिनिधीत्व करतात. ग्राहकांचे हृदय, उत्पादनाचे हृदय आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील प्रगतीचे हृदय असा त्याचा अर्थ होतो.

* बेंटले :-

बेंटले ही एक जागतिक प्रसिध्द ब्रिटीश ऑटोमेकर कंपनी आहे. ही कंपनी लक्झरी कार बनविण्यासाठी प्रसिध्द आहे. बेंटलेच्या लोगोमध्ये मोठ्या बी च्या दोन बाजूला उंचावर पंखे दाखवण्यात आलेली आहेत. यावरुन कंपनी गर्वाने असा दावा करते की, जसा पक्षी आकाशामध्ये उंचच उंच उडतो, तशी आमची कार वाऱ्याच्या वेगाने पळू शकते.

* फोक्सवॅगन :-

फोक्सवॅगनच्या लोगोमध्ये व्ही हे अक्षर फोकस दर्शविते ज्याचा जर्मन भाषेमध्ये अर्थ होतो माणसे आणि दुसरा डब्ल्यू म्हणजे वॅगन ज्याचा अर्थ होतो कार, म्हणजेच लोकांसाठी बनलेली कार असा या पूर्ण लोगोचा अर्थ आहे.

* मर्सिडीज बेंझ :-

मर्सिडीज बेंझचा लोगो हा सर्वांत आत्मविश्वास दर्शविणारा आहे. मर्सिडीज बेंझ यांच्या लोगोमध्ये असलेले तीन स्टार हे कंपनीचे गुणवत्तेवरील वर्चस्व आणि संपूर्ण विश्वामध्ये सापडणार नाही अशी स्टाईल दर्शविते.

* गुगल :-

गुगलच्या लोगोमध्ये सलग चार प्राथमिक रंग आहेत. जे दुसऱ्या दुय्यम रंगांनी जोडलेले आहेत. यावरुन गुगल हे दाखवण्याचा प्रयत्न करत आहे की, ते कधी ही नियमांशी खेळत नाहीत म्हणजे त्यांचे

उल्लंघन करत नाही.

✻ आयबीएम :-

आयबीएमच्या लोगोमध्ये संपूर्ण जगाचा अर्थ लपलेला आहे. आयबीएमच्या लोगोवर असलेल्या पांढऱ्या रेषा ह्या समानतेचे चिन्ह दर्शविते आणि त्याच्या उजव्या बाजूवरील खालच्या रेषा या समानता दर्शवितात.

✻ मास्टरकार्ड :-

मास्टरकार्डच्या लोगोमधील लाल रंगाचा वापर उत्कटता, धैर्य आणि आनंद दर्शवितो. तसेच पिवळा रंग हा आशावाद, समृध्दता आणि समृध्दी दर्शवितो.

✻ ॲमेझॉन :-

ॲमेझॉनच्या लोगोमधील पिवळी रेषा तुम्ही पाहिली असेल. या रेषेला जवळून पाहिल्यास असे लक्षात येते की, ती रेषा म्हणजे एक प्रकारची स्माईल आहे. तसेच ही रेषा अ पासून सुरु होते आणि न ला संपते याचा अर्थ येथे अ टू न म्हणजे सर्वकाही मिळेल.

असे हे लोगो काही न काही आपल्या आकारमानातून आणि डिझाईनमधून लोकांना सांगण्याचा प्रयत्न करत असतात. जर या लोगोबद्दल कधी तुमच्या मनामध्ये शंका निर्माण झाली असेल, तर ती शंका आता नक्कीच दूर झाली असेल.

कु. मानसी गायकवाड,
बी.कॉम. भाग-३

## विनोद

लोक म्हणतात कि,
एक दिवस दारू पिल्याने सतत सवय लागते
एकदम चूक
आम्ही लहानपणापासून अभ्यास करतोय
लागली का सवय ?
याला म्हणतात **Control**

काही कळतच नाही राव
पगारवाढ मागितली की बॉस म्हणतो,
''तू काय काम करतोस''
आणि रजा मागितली की म्हणतो,
''तुझ काम कोण करणार?''



# व्यथा पूरग्रस्ताची

'कृष्णामाई' ऐकायला कसं सोज्वळ वाटणारं नावं. माझ्या पूर्ण आयुष्यात मी तिचं हे सोज्वळ रुपच पाहत आलेले आहे. तिचं ते खळाळणारं पाणी, तिच्यावर तो रोजचा असणारा अरुणोदयाचा आणि अरुणास्ताचा प्रभाव, तिची सुंदर लांब पर्यंत पांढरी शुभ्र जाणारी अखंड लकेर. बापरे! माझ्याकडे तर तिचं वर्णन करण्यासाठी शब्दच नाहीत. तिचं आणि माझं नातं हे जुळ्या बहिणीसारखं. माझं दुखणं तिला न सांगताच कळायचं. माझी घरात काही कुरकुर झाली असेल, आई रागावली, बाबा ओरडले, शाळेत मार्क कमी मिळाले की मी तिच्याकडे जायचे. नाही, नाही, मी नाही स्वतःहून तिच्याकडे जायचे, तर तिच मला बोलावून घ्यायची. आमचं घर अगदी तिच्या काठावरचं, माझं मन उदास झाल की, लगेच तिच्या खळाळणाऱ्या लाटांचा आवाज माझ्या मनी गुंजायचा आणि माझ्या त्या लाडक्या बहिणीचे वेडं प्रेम मला खुणावायचं. मला ना बहिण ना भाऊ. पण ही वेडी कृष्णा मात्र माझी जुळी बहीण आणि आमच्या घराच्या थोड्याफार अंतरावर एक छोटसं, गणरायचं मंदिर-दर राखीपौर्णिमेला त्याला राखी बांधायची आणि भाऊबीजेला ओवाळायचं. दर खेपेची ओवळणी मला तो आपोआप द्यायचा. मी त्याला आज राखी बांधली आणि दोनच दिवसांनी मला कळलं मी वर्गात पहिली आली आहे आणि मी मनात म्हणाले, गणू मिळाली रे मला ओवळणी.

एकदा असंच घरात काम केलं नाही म्हणून आई खूप ओरडली. वाईट वाटलं, रडू आलं, मन सैरभैर झालं. पण मीच माझी समजूत घालत होते, जाऊदे आई आहे आपली. आपल्या चांगल्याचसाठी ओरडते आणि मी जरा शांत झाले. मनात कोणताच विचार नव्हता. तेवढ्यात पक्ष्यांची किलबिल ऐकू आली. वेळ संध्याकाळचीच आणि तिच्या लाटांचा तो मला बोलावणारा आवाज देखील मला खुणावू लागला. माझी पाऊलं तिच्या दिशेने जाऊ लागली आणि मी गेले..... जाऊन पाहते तर काय? सुंदर सूर्याची लालसर केशरी किरणं तिच्या निळ्याशार पाण्यावर पसरलेली आणि सुंदर मंद वारा तिथेच असणाऱ्या बकुळीच्या फुलांचा मनमोहक सुवास माझ्या मनावरचा ताण नकळत कमी करुन गेला. ते लालसर केशरी प्रकाशाने अच्छादलेले ते जलतरंग मला जणू सांगत होते, अगं आईची माया ही सूर्यप्रकाशासारखीच आहे. प्रसंगी कधी ऊबदार वाटते तर कधी प्रखर आणि तो मंद वारा आणि बकुळीच्या मनमोहक सुवास मला माझ्या आईच्या कोमल मायेच्या स्पर्शाची आठवण करुन देऊन गेला. अशी ही माझी कृष्णामाई माझ्या रोजच्या सुखदुःखाची भागीदार झालेली.

थोड्यावेळाने मी घरात दिसेना म्हणून आई मला शोधत नदीतीरावर आली आणि तिला वाटलं मी काहीतरी चुकीचं पाऊल उचलतीयं म्हणून तिने मला विचारले, ''काय गं, सोनू इथं काय करतीयेस?'' मी तिला म्हणाले, ''अगं आऊ तुला वाटतं तसं काहीच नाही, मी तर माझ्या बहीणीजवळ आलीयं. बघ जरा

तुला पण तिच्यात लेकीचा आभास जाणवेल.'' मी तिच्या पाण्याशी खेळत म्हणाले. मग आईची खात्रीच झाली. जाऊ दे मी हिला ओरडल्याच्या निमित्ताने तिला तिची बहीण मिळाली.

हा झाला एक प्रसंग, अजून मी असे तुम्हाला किती सांगू, सांगत बसले तर मला पुढं जे बोलायचंय तेच राहून जाईल.

ही अशी माझी जुळी बहीण 'कृष्णामाई' माझ्यावर आणि माझ्या गावकऱ्यांवर एवढी रागावेल असं मला कधी स्वप्नात सुध्दा वाटलं नव्हतं. मी वर जो कथित केलेला प्रसंग आहे ना तो माझ्या आणि कृष्णामाईच्या नात्याची ग्वाही देणारा पहिला वहिला प्रसंग. यानंतर असे कित्येक प्रसंग घडले. त्यामुळे मी आईला म्हटले की आई मी कृष्णामाईकडे जाऊन येते की ती यावर कधीच आक्षेप घेत नसे. पण मागे जरासा पाऊस होता नाही म्हणलं तर सलग पाच दिवस धो-धो पडत होता. मग मी आईला म्हणलं आई मी माईकडे जाऊन येते गं. तर आई म्हणाली नको गं राजा, आज नको जाऊ तुझी कृष्णामाई आज जरा उसळतीय, खवळलीय गं ती जरा. जरा पाऊस ओसरला की मग जा हं.... आईचं हे वाक्य ऐकून मी जराशी हिरमुसले, काही तरी खाऊन निराश मनाने झोपी गेले. रात्री जरा डुलका लागला तर बाबा जोरजोरात आईला आणि मला उठवत होते, ''ऐ मीना, सोनू लवकर उठा बघा सगळ्या घरात पाणी आलंय.'' मी दचकून उठले, म्हणाले काय झालं बाबा, एवढं पाणी कसं काय आलं घरात. जवळजवळ पायाच्या नडग्यापर्यंत तीन-चार तासात पाणी घरात आलं होतं. बाबा पडक्या चेहऱ्याने म्हणाले, कृष्णामाई आपल्यावर कोपली गं सोनू! बाबांचे हे उद्‌गार ऐकून मी कावरीबावरी झाले. मला समजेच ना नक्की काय चालू आहे. कारण मी जिला बहीण मानते ती कशी कोपू शकेल? तुम्ही तरी कधी एक बहीण तिच्या बहीणीवर कोपलीय असं ऐकलयं का?

बाहेर नुसता पावसाचा आणि खळाळत्या पाण्याचाच आवाज ऐकू येत होता. तिच्या लाटांचा तो मला खुणावणारा आवाज मी खूप Miss करत होते.

मी भानावर आले, माझ्या आता लक्षात येऊ लागलं होतं की आपण पुरात अडकत चाललो आहोत. मी जिवाच्या अकांताने रडू लागले. घरात होतं नव्हतं ते सारं हळू-हळू पाण्याखाली चाललं होतं. मला हळू-हळू परिस्थितीचं गांभीर्य लक्षात येऊ लागलं होतं. आईने पण जोरात हंबरडा फोडला होता. कधीही टेन्शन न घेणारे सतत हसतमुखाने राहणारे बाबा देखील कोलमडले गेले होते. मला नेहमी माझ्या सुखदुःखाच्या क्षणी साथ देणाऱ्या माझ्या कृष्णामाईने आज रौद्र आणि विदारक रुप धारण केलं होतं. माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसत नव्हता. बाबांच्या काही ओळखीवरून NDRF चे जवान आम्हांला वाचवायला आले.

मी, आई आणि बाबा आम्ही तिघे हेलिकॉप्टर मध्ये बसलो आणि उंच भरारी घेतली. खाली वाकून पाहते तर काय??? अबब !!! सगळं सांगली माझ्या कृष्णामाईने कवेत घेतलं होतं.

मला काळजी फक्त बाबांची होती, त्यांना जे काही घरात होतं नव्हतं ते सारं पुन्हा नव्याने उभा

करावं लागणार होतं. बाबांचा तो उदास चेहरा सगळं काही सांगून जात होता. मला माझ्या गावाचे झालेले हाल पाहून प्रसिध्द कवी कुसुमाग्रज यांची एक प्रसिध्द कविता आठवते : कणा असं त्या कवितेचं नांव

''ओळखलंत का सर मला'' पावसात आला कोणी
कपडे होते कर्दमलेले केसावरती पाणी
क्षणभर बसला, नंतर हसला, बोलला वरती पाहून
'गंगामाई' पाहुणी आली, गेली घरट्यात राहून
माहेरवाशीण पोरीसारखी चार भिंतीत नाचली
मोकळ्या हाती जाईल कशी बायको मात्र वाचली
भिंत खचली, चूल विझली, होते नव्हते नेले
प्रसाद म्हणून पापण्यांमध्ये पाणी थोडे ठेवले
कारभारणीला घेऊन संगे सर, आता लढतो आहे.
पडकी भिंत बांधतो आहे. चिखलगाळ काढतो आहे.
खिशाकडे हात जाताच हसत हसत उठला
पैसा नको सर जरा एकटेपणा वाटला
मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेवून फक्त लढा म्हणा''

कु. साक्षी देशपांडे,
बी.एस्सी. भाग-३

## ********** शेरो शायरी **********

ना पूछो कि मेरी मंजिल कहाँ है,
अभी तो सफर का इरादा किया है,
ना हारुंगा हौसला उम्र भर,
ये मैंने किसी से नहीं खुद से वादा किया है

'' जो खो गया, उसके लिए रोया नहीं करते,
जो पा लिया, उसे खोया नहीं करते,
उनके ही सितारे चमकते है,
जो मजबूरियों का रोना रोया नहीं करते''

''किसी भी उम्मीद के बिना,
हमेशा सबका अच्छा करने की कोशिश करना
क्योंकि किसी ने कहा है की, जो लोग फूल बेचते है,
उसके हाथों में खुशबू रह ही जाती है''

जिंदगी में कभी उदास ना होना
कभी किसी बात पर निराश ना होना
ये जिंदगी एक संघर्ष है चलती ही रहेगी
कभी अपने तीने का अंदाज ना खोना



# शिवरायांची गडकोटनिती

प्राचीन काळापासूनच किल्ल्यांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. शिवकाळात तर किल्ल्याचे महत्त्व हे कळसाच्या टोकाला पोहचले होते. भारतातील गडकोट व किल्ल्यांचे निरिक्षण केले तर महाराष्ट्रात किल्ल्यांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसते. मराठेकालीन किल्ल्यांचे प्रकार पाहिल्यास डोंगरी किल्ला, भुईकोट किल्ला, जंजिरा जलदुर्ग हे किल्ले मुख्यतः शिवकाळात अस्तित्वात होते.

स्वतः शिवाजी महाराजांनी किल्ल्यांच्या विषयी एका पत्रात म्हटले आहे की, ''जसा कुणबी शेतात माळा घालून शेत राखतो तसे किल्ले हे राज्यांच्या रक्षणासाठी आहेत.'' ''तारवांस खिळे मारुन बळकट करतात तशी राज्यास बळकटी किल्ल्यांचे आहे.'' दिल्लीचा बादशहा आमच्या स्वराज्याचा नाश करावयास टपला आहे. त्याची स्वारी आमच्या झाली तरी त्याला जुने-नवे ३६० किल्ले आहेत. एक-एक मिळून तो वर्ष-वर्ष लढला तरी त्यास ३६० वर्ष लागतील. या पत्रावरुन छत्रपती शिवाजी महाराजांची दूरदृष्टी लक्षात येते. छत्रपती शिवरायांच्या स्वराज्य स्थापनेच्या पहिले राजकीय केंद्र आणि स्वराज्याची पहिली राजधानी 'राजगड' होस. जवळपास २४ वर्षे (१६५० ते १६७४) महाराजांच्या सर्व कार्यांचा साक्षीदार असलेला हा गड खरोखरच 'राजांचा गड' या अर्थाने सुध्दा राजगड नावास पात्र आहे. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांची, डोंगररांगाची, दाट जंगलांची आणि अवघड वाटांची संरक्षण आणि आक्रमणासाठी नैसर्गिक योग्यतेची अचूकता ओळखून सह्याद्रीला आपल्या राज्यांचा जणू कणाच करणारे तसेच भौगोलिक रचनेचा परिपूर्ण फायदा करुन घेणारे छत्रपती शिवाजी महाराज हे पहिले युध्दकला विशारद होते. अशा डोंगरी किल्ल्यांमुळेच महाराजांचे गनिमी कावा यशस्वी झाले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी डोंगरी किल्ल्यांना जसे महत्त्वाचे स्थान दिले, तसेच महत्त्व जलदुर्ग किल्ल्यांना पण दिले आहे. समुद्रावरून होणारे आक्रमण जसे फ्रेंच, पोर्तुगीज, इंग्रज, सिध्दी या मुळे स्वराज्यास फार मोठा धोका निर्माण होणार या दृष्टीने शिवाजी महाराजांनी परदेशी सत्तांना, उत्तरे देण्यासाठी मालवणच्या समुद्रातील कुट्टे नावाचे बेट भौगोलिक रचनेने महाराजांना एकदम पसंद पडले. या बेटावरच महाराजांनी नूतन जंजिरा म्हणजे जलदुर्ग वसविण्याचा निर्णय घेतले. त्यास नाव ठेवले 'सिंधुदुर्ग'. महाराजांनी या किल्ल्यासाठी पाण्यासारखा पैसा खर्च केला. मराठ्यांच्या महापराक्रमाला सागरांचे दरवाजे उघडून देणारे छत्रपती शिवाजीराजे हे पहिले राज्यकर्ते होते. औरंगजेबाच्या दक्षिण धोरणात स्वराज्यातील एका मागून एक किल्ले मुगलांच्या ताब्यात जात होते, पण सिंधुदुर्ग हा किल्ला शेवटपर्यंत अजिंक्य राहिला. या वरून महाराजांची दूरदृष्टी लक्षात येते.

महाराजांच्या या आरमारी शक्तीचे महत्त्व सांगताना रामचंद्रपंत आमात्य आपल्या आज्ञापत्र या ग्रंथात लिहितात, ''आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यगंज आहे. जैसे ज्यास अश्वबल त्याची पृथ्वी प्रजा आहे. तद्वतच ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र. याकरिता आरमार अवश्यमेव करावे.'' तसेच जर शत्रूने किल्ल्यास वेढा

दिला तर किल्ल्यावर महिना पुरेल इतका अन्नसाठा असणे आवश्यक. हे शिवाजी महाराजांच्या सर्व किल्ल्यांच्या बांधणीत असल्याचे दिसते. त्याचबरोबर नैसर्गिक झरे व तळे, विहरी यांना पण विशेष महत्त्व होते. किल्ला दुर्गम असेल तर १०० सैनिक सुध्दा १०,००० सैनिकांशी लढा देऊ शकतात. हे सर्व जाणून शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यात किल्ल्यांच्या बांधणीला विशेष स्थान दिले होते.

कु. अश्विनी गोब्बूर,
बी.ए. भाग-३

# पिता

मेरा साहस मेरी इज्जत मेरा सम्मान है पिता ।
मेरी ताकत मेरी पूजा, मेरी पहचान है पिता ।।

घर की इक-इक ईट में शामील उनका खून-पसिना ।
सारे घर की रौनक उनेस सारे घर की शान पिता ।।

मेरी इज्जत मेरी शोहरत मेरा रुतबा मेरा मान है पिता ।
मुझको हिम्मत देनेवाले मेरा अभिमान है पिता ।।

सारे रिश्ते उनके दम से सारे नाते उनसे है ।
सारे घर के दिल की धडकन सारे घर की जान पिता ।।

शायद रब ने देकर भेजा फल ये अच्छे कर्मो का ।
उसकी रहमत उसकी नेअमत उसका है वरदान पिता ।।

अक्षता प्याटी, बी.कॉम.-३





# वाचन संस्कृतीची गरज

एखाद्या व्यक्तीने ठरविले की आपण काही एक वाचायचे म्हणून नाही, तर त्याचे या जगात निभावेल काय? होय. सहज निभावेल. भारतात निरक्षर माणसेच बहुसंख्य आहेत. जगातही आहेत. त्यांचे जीवन चाललेच आहे.

अनेक व्यक्ती श्रवणाने किंवा गुरुमुखातून विद्या शिकतात. अनुभवातूनही पुष्कळ ज्ञान मिळते. अनुकरणानेही पुढे कौशल्य संपादन करता येते. एखादा सुतार, लोहार, शिल्पी निरक्षर असूनही त्याच्या व्यवसायात कुशल असतो. व्यवहारात यशस्वीही असतो. एखादा गायक किंवा नर्तक कलाकार आपल्या कलेत श्रेष्ठ होतो. त्यासाठी तो कदाचित काही वाचन न करताही तसा झालेला दिसतो. मोक्ष, परमेश्वर भक्ती, प्रिती, पैसा, सत्ता, पराक्रम अशी महत्त्वाची ध्येये अनेक निरक्षरांनीही मिळवली आहेत. पुस्तकी विद्या पढतमूर्ख बनवते, पोथीनिष्ठा ही अत्यंत वाईट आहे. जीवनाचा ग्रंथ हा खरा, पुस्तकात असते खोटे, स्वप्नमय, फसवे असे काही मंडळी प्रतिपादन करीत असतात.

अनेक ग्रंथाकार नाना मतांचा नुसताच गलबला माजवतात, खरं ज्ञान वेगळं आहे व आपण केवळ शब्दांच्या बुडबुड्यात वावरतो.

'ग्रंथ हेच गुरु' किंवा 'वाचाल तर वाचाल' अशी सुभाषिते आपण अनेकदा वापरतो. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. अनेक महान नेत्यांचे वाचन अफाट होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे तर ग्रंथ प्रेमी म्हणून प्रसिध्द होते. एवढेच नव्हे तर प्रसंगी उपाशी राहूनही पुस्तक खरेदीचा ध्यास त्यांनी इंग्लंडमधील वास्तव्यात घेतला होता. शिक्षण व्यवस्थेतही वाचनाचे महत्त्व अनन्य साधारण आहे.

विद्यार्थी-शिक्षक-मुख्याध्यापक या साऱ्या घटकांनी सतत वाचन केल्याशिवाय ज्ञानार्जन होऊ शकत नाही. हे सगळं खरं असूनही अलीकडे वाचनाची आवडच कमी झाली आहे. विद्यार्थ्यांनी वाचावं असं अपेक्षित असलं तर शिक्षकांनी त्यांना वाचनाचा छंद जोपासायचा कसा हे प्रत्यक्ष कामातून, प्रकल्पातून दाखवून दिले पाहिजे. पाठ्यपुस्तके मुलांकडून हाताळली जातात. पण अवांतर पुस्तके मात्र जाणीवपूर्वक वाचयला लावली पाहिजे. शालेय ग्रंथालय समृध्द असणं, हे शाळेने अभिमानाने मिरवता यावं असं भूषण आहे. ग्रंथालयात विविध विषयांवरील ग्रंथ, मासिके,नियतकालिके इ. बरोबर आता संगणक-इंटरनेट यांनीही समृध्द असायला हवे. शाळेने मुलांना वाचनाची, लिखाणाची आवड निर्माण करण्याकरिता वर्गामधूनच 'बुक-बॉक्स' सारखे उपक्रम करायला हवे.

'वाचाल तर वाचाल' ही म्हण आजच्या घडीला किती समर्पक आहे. हे आपण सर्वच जाणतो. परंतु, आजच्या तरुण पिढीला याचं महत्त्व कळण्यासाठी हा लेखप्रपंच. आजच्या युगातील तरुणांना वाचनाचे वेड

असायला हवे, तरच वाचन संस्कृतीची वाढ होईल आणि पर्यायाने त्याचा उत्तम युवापिढी घडण्यासाठी उपयोग होईल.

आजच्या मनुष्याच्या ठिकाणी असणारे ज्ञान ही त्याची फार मोठी शक्ती आहे. या शक्तीच्या साहय्याने तो सुबुध्द आणि प्रगल्भ तर होतोच; परंतु, त्याच्या कार्यसंस्कृतीवर सुध्दा त्याचा प्रभाव पडतो. वाचन संस्कृती टिकवून धरण्यासाठी आणि प्रत्येक माणसाचे मन सुविचार संपन्न होण्यासाठी वाचनाची आवड मुळातूनच निर्माण होणे आवश्यक आहे. तरुणांमध्ये वाचन वेड उत्पन्न व्हायचे असेल तर तशी परिस्थिती त्यांच्याभोवती निर्माण होणं गरजेचं आहे. वाचनाने माणूस मोठा होत असतो. पुस्तकांचे वाचन कराल तेवढेच ज्ञान वाढत जाईल.

''ग्रंथ हे गुरु आहेत'' मात्र आज वाचनासाठी अनेक उत्तम साधने हातात उपलब्ध असूनही तरुण पिढी वाचनापासून दूर जात आहे. ती मोबाईलच्या आहारी जाऊन आणि इंटरनेटवर वेळ घालवत असल्याचे आजचे चित्र आहे. त्यांना वाचनासाठी वेळ उपलब्ध नसतो. नव्या माध्यमांच्या आगमनानं वाचन संस्कृती लोपते आहे. तरुणांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी. त्यांना वाचनाचे महत्त्व कळावे यासाठी विविध उपक्रमांद्वारे जनजागृती निर्माण करण्याची गरज निर्माण झाली आहे.

लोकमान्यांनी 'तुम्हाला तुमचे व्यक्तिमत्व घडवायचे असेल तर वाचन करा' असा संदेश दिला. धावत्या युगाच्या बरोबरीने धावायचे असेल तर वाचन करा, असा उपदेशही त्यांनी दिला.

''वाचन म्हणजे जीवनाला उन्नत करणारी बाब असून यामुळे बुध्दीची मशागत होते'' माणसाचे जीवन फुलविण्यात वाचनाचा महत्त्वाचा वाटा असतो. यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृध्द करा. त्याचप्रमाणे जगण्याच्या परिपूर्णतेसाठी वाचन हे आवश्यक आहे. ज्ञानात सतत वाढ करण्यासाठी वाचन हा एकमेव मार्ग आहे. पूर्वी पुस्तक मिळण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे वाचनालय होय. ऑनलाईन साईटस्मुळे विविध विषयांमधील पुस्तके मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. परंतु, असे असले तरी वाचन संस्कृती हळूहळू कमी होत आहे. विविध विषयांची चांगली पुस्तके आपल्याला जगण्याची नवी दिशा दाखवतात. पुस्तकांमधील समृध्द विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला आपला दृष्टीकोन कायमचा बदलून जातो. पुस्तक हे केवळ शब्दसंपदा वाढवण्यास मदत करणारे साधन नसून पुस्तक हे अनुभवांसह कल्पनांचे, आशा-आकांक्षाचे क्षितीज निर्माण करणारे साधन आहे. वाचनाची सवय एकदा लागली की माणूस मनावरचा ताण कमी करण्साठी पुस्तकांच्या सहवासात गुंगून जातो. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो. आजकालच्या तरुणाना खूप ताण असतो. त्या अनुषंगाने वाचन त्यांना मदत करू शकते. वाचन संस्कृती जपण्याशिवाय पर्याय नाही.

वाचनामुळे माणूस प्रगल्भ होतो. नियमित वाचन केले तरच भावी पिढी सक्षम व सुजाण होईल. तरुण पिढीने पुस्तक वाचन हा छंद जोपासला पाहिजे. साक्षर तरुणांपैकी ६१ टक्के जण, त्यांनी साध्य केलेल्या उद्दिष्टांबाबत समाधानी आहेत. मात्र, वाचनाचा छंद असलेल्या तरुणांमध्ये समाधानाचे प्रमाण ७० टक्के तर

कमी वाचन करणाऱ्यांमध्ये हेच प्रमाण ५८ टक्के आहे.

वाचन समृध्द असले म्हणजे लेखनाचीही प्रवृत्ती प्रबल होते, कल्पनाशक्तीला वाव मिळतो. रसिकता वाढीस लागते, सृजनशीलतेला वाट सापडते, सहृदयता, दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव ती समजून घेण्यासाठी आवश्यक असणारे संवेदनशील मन यांस खतपाणी मिळते. इतरांबाबत, समाजाबाबत आपली काही कर्तव्ये आहेत याचे भान प्राप्त होते.

मन संकुचित, क्षुद्र गोष्टीत अडकत नाही. वाचनामुळे माणसाला माणूस म्हणून असलेल्या अस्तित्वाचे मोल किती अनमोल आहे याचे भान प्राप्त झाल्याशिवाय राहत नाही. ''माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन 'वाचन प्रेरणादिन' म्हणून साजरा करत आपण वाचन संस्कृतीचा जागर करुया.''

कु. ऐश्वर्या मिराखोर
बी.कॉम. भाग-३

## विनोद

### रेशनकार्ड

ज्योतीषी : तुझं नाव झंप्या आहे?
झंप्या : हो बरोबर!
ज्योतीषी : तुला एक मुलगा आहे
झंप्या : हो ज्योतीषी महाराज
ज्योतीषी : तू आत्ताच पाच किलो गहू घेतले.
झंप्या : तुम्ही अंतर्यामी आहात महाराज
ज्योतीषी : मूर्खा, पुढच्या वेळी येताना पत्रिका घेऊन ये, रेशनकार्ड नको

### "Dandruff Free"

एक मुलगी शैम्पू आणायला दुकानात जाते.
दुकानदार शैम्पूची बाटली देतो.
ती मुलगी दुकानदाराला पैसे देते आणि म्हणते
''यावर हे जे फ्री आहे ना ते पण द्या ना.''
दुकानदार : यावर काहीही फ्री नाहीये.
मुलगी : खोटं बोलू नका, यावर एवढ्या मोठ्या अक्षरात लिहिलयं,
"Dandruff Free"





# स्वच्छ भारत अभियान

''खेडूत सामान्य माणूस असो वा शहरी जंटलमन....
परमकर्तव्य सकळांचे परिस आपुला ठेवावा छान....
चंद्र, मंगळावर, परग्रहांवर जाऊन आले माणसाचं यान....
खंत वाटते अजूनही राबवावी लागते स्वच्छता अभियान...''

हो, खरंच खंत वाटते की, आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळून ७२ वर्षे लोटली. आपल्या सरकारला स्वच्छता अभियान राबवावे लागते, लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून द्यावे लागत आहे. भारतभूमीला ब्रिटीशांच्या तावडीतून स्वातंत्र्य मिळाले खरे पण अजूनही भारतभूमी अस्वच्छतेच्या तावडीतून स्वातंत्र्य मिळण्याच्या प्रतिक्षेत आहे. आजही भारतमाता देशवासियांना स्वच्छता रुपी स्वातंत्र्य मागत आहे.

किती महान अन् आदर्श आपली संस्कृती
किती महान अन् पराक्रमी आपुला इतिहास
किती महान अन् समृध्द आपला देशवारसा

आपला भारत देश सर्वांगीण इतका महान आहे आणि तरीही कोणी परदेशी व्यक्ती आमच्या देशातील अस्वच्छतेवर बोट ठेवावे? अस्वच्छतेवर संशोधन करावे? लेख लिहावे चित्रपट बनवावे? या गोष्टी नक्कीच कोणाही भारतीयाला अभिमानास्पद नाहीत.

आपली भारतभूमी म्हणजे असंख्य महापुरुषांच्या पराक्रमाने, संत महात्म्यांच्या शिकवणीने, देव-देवतांच्या वास्तव्याने, पदस्पर्शाने पावन-पवित्र झालेली भूमी. पण हे पावित्र्य आपण अस्वच्छतेचे साम्राज्य निर्माण करुन नष्ट तर करत नाही?

स्वच्छता नांदते तिथे परमेश्वर नांदतो हे शिकविणारी आपली भारतीय संस्कृती विसरतोय का? असे प्रश्न मनात निर्माण होतात. हे असे विरोधाभासाचे चित्र का निर्माण झाले असावे? कारण अनेकजण मानतात की, स्वच्छता करणे, सफाई करणे हे आपले कामचं नाही; ते काम सरकारचे, सफाई कामगाराचे आहे. मला तर वाटते या देशातील सर्वश्रेष्ठ कामगार/कर्मचारी कोण असतील तर तो आहे सफाई कर्मचारी कारण ते आपला देश स्वच्छ करतात, ठेवतात पण मित्रांनो केवळ सफाई कर्मचारी स्वच्छता किती करणार? त्याला ही सीमा आहे. देशातील प्रत्येकजण अस्वच्छता न करण्याचे ठरवीलं तेव्हा देश स्वच्छ व सुंदर राहील.

होय ! हे चित्र हळूहळू बदलत आहे. भारताचे १५ वे पंतप्रधान सन्माननीय श्री नरेंद्र मोदी साहेबांनी २ ऑक्टों.२०१४ या महात्मा गांधी जयंती दिनी स्वतः हातात झाडू घेऊन स्वच्छ भारत अभियानाचा शुभारंभ केला. २ ऑक्टों. २०१९ गांधीजीच्या १५० व्या जयंतीनिमित्त स्वच्छ देश निर्माण करण्याचे देश बांधवाना आव्हान केले. हातात झाडू घेऊन सफाई करणाऱ्याची प्रतिष्ठा या अभियानाने वाढवली. हे अभियान सामाजिक अभियान आहे. शेवटी या अभियानाचे यश हे प्रत्येक भारतीयांच्या हातात आहे.

स्वच्छ भारत, सुंदर भारत ! जयहिंद !

कु. अंजली मळेवाडी
बी.कॉम. भाग-२



# संतसाहित्य आणि आजचा तरुण

अलिकडच्या काळात संतसाहित्य केवळ निवृत्तीनंतर साठ-पासष्ठीच्या घरात वय असलेल्या लोकांनी वाचण्याची गोष्ट बनली आहे. संतसाहित्याविषयी तरुणांना फारशी ओढ नाही; पण आपल्या सगळ्या तरुण पिढीची मुळं ही या शेकडो वर्षाच्या संत परंपरेत दडली आहेत. त्यामुळे आजच्या तरुणांनी संतसाहित्याकडे आस्थेने बघण्याची गरज आहे. वारकरी संतांची अभंगवाणी नित्यनूतन आहे. नामदेवरायांपासून तुकोबारायापर्यंत आणि पुढे गाडगेबाबांपर्यंतच्या संतांनी आपल्याला अनेक गोष्टी शिकवल्या आहेत. त्यांचा थोडा आढावा घ्यायला हवा.

संतसाहित्य म्हणजे प्रेमाचेच साहित्य. प्रेम हा तरुणांच्या जीवनाची गाथा. आपल्याकडच्या संतपरंपरेनेही प्रेमाचीच शिकवण दिली आहे. कबीर म्हणतात - 'पोथी पढी, पढी जग मुआ पंडित भया न कोय, ढाई अक्षर प्रेम का पढे सो पंडित होय'

संतांना पोथ्या-पुराण वाचणाऱ्या पंडितापेक्षा 'प्रेम' करणारा 'प्रेमपंडित' जवळचा आहे. संत पोथ्या-पुराण वाचणाऱ्या आपल्या आजोबांच्या बाजूचे नसून प्रेम करणाऱ्या तुमच्या-माझ्या तरुणांच्या बाजूचे आहेत. संतांनी पांडुरंगावर प्रेम करायला शिकवलं. आपले नामदेवराय तर पांडुरंगाचे प्रेमभांडारच. संत मीराबाई या तर प्रेमयोगिनी म्हणूनच ओळखल्या जातात. आमच्या बहिणाबाईचं त्यांच्या कपिला गायीवर प्रेम होतं. सावतोबांचं शेतातल्या भाजीपाल्यांवर प्रेम होतं. सगळ्यावर प्रेम करायला हवं. माणसांवर प्रेम करायला हवं, गर्लफ्रेंडवर प्रेम करायला हवं, बॉयफ्रेंडवर प्रेम करायला हवं हा तर संतविचारांचा गाभा आहे.

जवळजवळ सगळे संत तरुण आहेत. तरुणपणात त्यांनी तरुणांसाठीच साहित्य लिहिले आहे. तुकोबारायांचे अभंग अनेकांना अश्लिल वाटतात; पण पंचविशीतल्या या बंडखोर तरुणाने असली रांगडी भाषा वापरायलाच हवी ना? आमचे मार्गदर्शक तरुण पत्रकार सचिन परब यांनी 'तरुणांचा तुकाराम' असा एक लेख लिहिला होता. त्यात त्यांनी तुकाराम महाराजांची तरुण बंडखोरी मांडलीय. तुकाराम महाराज म्हणजे बारा तास भजन करणारे संत नव्हेते. दोन बायका आणि चार-पाच पोरं असलेले तुमच्या-माझ्या सर्वसामान्य माणसांशी एकरुप असलेले वारकरी होते. तुकोबारायांच्या अभंगात 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे' म्हणजे उत्तम व्यवहारांनी धन जोडण्याचा आग्रह आहे. पाईकीच्या अभंगात तरुणांना गनिमी काव्याच्या युध्दतंत्राचा उपदेश आहे. या अभंगातल्या उपदेशाने भारावलेली मावळ खोऱ्यातली एक पिढी शिवरायांच्या स्वराज्य लढ्यात मावळे बनली. पुढे महाराष्ट्रातल्या सगळ्या समाजसुधारकांवर आपल्या तुकोबारायांचा प्रभाव आहे.

नामदेवराय हे सातशे वर्षापूर्वीचे संत त्यांनी तर कमालच केली. त्यांनी त्या काळात पंजाब, गुजरात, राजस्थान, दिल्ली एवढं कमी की काय म्हणून आजच्या आफगाणिस्थानापर्यंतचा अख्खा भारत पायाखाली घातला. त्यांच्या संचाराच्या पाऊलखुणा भारतभर उमटल्या आहेत. सातशे वर्षे झाली; पण पंजाबातले लोक

अजूनही नामदेवयांना सोडायला तयार नाहीत. त्यांनी आपल्या नामदेवरायांची पंजाबातल्या घुमानमध्ये समाधी बांधली. शिखांच्या गुरुग्रंथसाहिब नावाच्या धर्मग्रंथात नामदेवरायांची एकसष्ठ पदे आहेत. तिथल्या अनेक माणसांची आडनांवसुध्दा नामदेवच आहेत. परप्रांतातल्या आणि परधर्मातल्या एखाद्या साधूचा इतका आदर इतकी वर्ष तिथली लोकं करतात म्हणजे आपले संत नामदेव किती मोठे असतील?

नामदेव आणि तुकाराम ही माणसं मोठी संत माणसं होतीच; पण आपल्या सोलापूरातील सिध्दरामेश्वर तर वैशिष्ट्यपूर्ण आहेत.ते तळ्यातील महादेव नाहीत तर अड्डुसष्ट हजार वचनं लिहीणारे थोर साहित्यिक आहेत. सामुदायिक विवाहसोहळे करणारे आणि तलाव खोदणारे समाजसेवकही आहेत. आजही त्यांच्या यात्रेत मातंग, माळी, ब्राह्मण, लिंगायत अशा वेगवेगळ्या जातीतील माणसांना नंदीध्वजाचा मान आहे. ते महात्मा बसवेश्वरांच्या अनुभव मंटपाचे जगद्‌गुरु होते. बरं आता बसवेश्वरांची एक गोष्ट आहे. ती तुम्हाला माहित असायला हवी. बसवेश्वरांनी चांभार, हरळय्या आणि ब्राह्मण मधुवारस यांच्या मुलामुलींचा आंतरजातीय विवाह लावला होता आणि मग 'सैराट' झालं. आर्चीच्या प्रिन्सदादानं जसं आर्ची परश्याला मारलं तसं त्या नवजोडप्याला हत्तीच्या पायाला बांधून जीवे मारलं. आपल्या आर्ची-परश्याच्या सैराटची मुळं ही नऊशे वर्षापूर्वीच्या बसवेश्वरांच्या लिंगायत तत्त्वज्ञानात आहेत.

संत परंपरा एका धर्माच्या खुराड्यात अडकणारी नाही. कबीर, लतीफ शेख, महंमद जैतुनबी अशा शेकडो मुस्लिम संतानाही या परंपरेने सामावून घेतलयं. संत जनाबाई, सोयराबाई, मुक्ताबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई अशा स्त्रीसंतांचीही मोठी पंरपरा महाराष्ट्राला लाभली आहे. फाजील कर्मकांडावर संतांचा विश्वास नाही. नामस्मरणाच्या सोप्या साधनेचा संतांनी स्विकार केलाय. त्यांनी कर्मकांडापेक्षा चित्तशुध्दीला महत्त्व दिले.

थोडक्यात सर्व जातीधर्माच्या स्त्रीपुरुषांना सामावून घेणारी, कर्मकांडाला विरोध करणारी, लोकभाषेचा पुरस्कार करणारी आणि चित्तशुध्दीच्या पायावर उभी असलेली ही तरुण वारकरी पंरपरा आजच्या तरुणांनी समजून घ्यायला हवी एवढीच अपेक्षा......!

चि. ज्ञानेश्वर बंडगर,<br>
बी.एस्सी. भाग-३

## विनोद

गण्या : काल तुझा मूड ऑफ का होता माझ्याशी बोलताना आणि आज एकदम मूडमध्ये

मन्या : काल यार बायकोने वीस हजार साड्यांवर उडवलेत.

गण्या : मग आज मूड ऑन का?

मन्या : आज त्या साड्या घेऊन तुझ्या बायकोला दाखवायला गेलीय.



# मराठी वाङ्मयाची समृध्द परंपरा

भाषा हा माणसाने लावलेला सर्वात मोठा शोध आहे. असे म्हटले जाते की, 'गरज ही शोधाची जननी आहे.' भाषेचा शोध मानवी आचार-विचार, भावना व्यक्त करण्याच्या गरजेतूनच लागला. माणूस जन्मल्यापासून  ते मरपेर्यंत आपले विचार, मत भाषेच्या माध्यमातूनच व्यक्त करत असतो. भाषा म्हणजे केवळ शब्दांची देवाण-घेवाण नव्हे, तर भाषेशी आपली मने, भावना संस्कार आणि संस्कृती जुळलेली असते.

अकरा कोटी लोकांची मायबोली असणारी मराठी ही भारतातील चौथ्या क्रमांकाची, तर जगातील दहाव्या क्रमांकाची सर्वाधिक बोलली जाणारी भाषा आहे. मराठी भाषे एवढाच मराठी साहित्याचा देखील इतिहास मोठा आहे. हा इतिहास घडवण्यात महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या संताचा, शाहिरांचा, नाटककारांचा, विचारवंताचा, कवी, निबंधकार, प्रवासवर्णनकार, भाषा शास्त्रज्ञ या सर्वांचा सिंहाचा वाटा आहे.

मराठी भाषा समृध्द आहे. मराठी भाषेतील वाङ्मयाला प्रदीर्घ ऐतिहासिक व गौरवशाली परंपरा आहेत. या ठिकाणी संत एकनाथ परखडपणे आपले विचार मांडताना असे म्हणतात की,

संस्कृत वाणी देवे केली । तरी प्राकृत काय चोरापासून आली  
असो तू या अभिमान भूलो । वृथा बोली काय मज।।

अशा प्रकारे अनेक संतांनी आपले विचार मांडलेले आहेत. तसेच लिखित वाङ्मयाबरोबरच लोकवाङ्मयाचीही मोठी परंपरा आहे. माणसाच्या मनातील विचारांना व्यक्त करण्याचे साधन व माध्यम म्हणजे भाषा! सर्वांत अधिक नितळपणे व्यक्त होता येते ते मातृभाषेतूनच.

मराठी मनाच्या हृदयाचा ठाव घेणारे व मराठी साहित्याला ज्ञानपीठ पुरस्कार मिळूवन देणारे कवी, नाटककार, समीक्षक म्हणजे वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या कवितेतील या काव्यपंक्ती मराठी भाषेविषयी विलक्षण माधुर्य असलेल्या या काव्यपंक्ती वाचताना प्रत्येक मराठी माणसाचा ऊर अभिमानाने भरुन येतो.

आमुच्या मनामनात दंगते मराठी, आमुच्या उराउरात स्पंदते मराठी ।  
आमुच्या नसनसात नाचते मराठी, आमुच्या रंगरंगात रंगते मराठी ।

मराठी साहित्यात दैदीप्यमान रत्न अशी ख्याती असणारे कुसुमाग्रज आत्मनिष्ठ आणि समाजनिष्ठ जाणीव असणारे आणि मराठी साहित्याच्या कक्षा रुंदावणारे लेखन त्यांनी केले. त्यांचे साहित्य म्हणजे वाङ्मयातील उच्च कोटीचे वैभव आहे. खऱ्या बदलांना स्विकारत, जुन्याचा वेध घेत नव्याचा शोध घेत आपली मराठी भाषा अशीच राहो.

मनस्वी शब्दांना लडिवाळपणे हाताळणाऱ्या अनेक साहित्यिकांनी मराठीतील विविध साहित्य प्रकारात मोलाची कामगिरी केली आहे. उदा. भा. रा. तांबे, पु. ल. देशपांडे, बालकवी माधव ज्युलियन, कवी

यशवंत, बा. भ. बोरकर, बाळशास्त्री जांभेकर, महात्मा ज्योतिबा फुले, बहिणाबाई चौधरी, इंदिरा संत, मोरोपंत या साहित्यिकांनी आपल्या लेखणीतून मराठी भाषा समृध्द केली.

प्राचार्य शिवाजीराव भोसलेंसारखे असामान्य वक्ते, ना. ग. गोरे, कवी वसंत बापट, ग.दि. माडगूळकर यांच्या सारख्या कवींनी आपल्या काव्यातून मराठी मनात स्वातंत्र्याचा नंदादीप नेहमी तेवत ठेवला. पांडुरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजी यासारख्या समाज प्रबोधन घडविणाऱ्या व्यक्तींचा वारसा मराठी भाषेला लागला आहे. असा कधीही काळाच्या उदरात शिवाजी महाराजांपासून आतापर्यंत मराठी भाषेचा वापर होत आलेला आहे आणि तो पुढेही होत राहणार.

विलक्षण शब्दवैभवाचे संचित लाभलेले मराठी साहित्य आणि वाङ्मय म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाची वैशिष्ट्यपूर्ण ओळख आहे. मराठी साहित्य प्रकारातील विविधतेमुळे मराठी भाषेच्या समृध्दीत निश्चितच भर टाकीत गेल्यामुळे भाषा समृध्दीस वाव मिळाला. अशीच मराठीत वाङ्मयाची परंपरा समृध्द राहो.

- कु. प्रगती बनसोडे
बी.एस्सी. भाग-१

## ********** शेरो शायरी **********

सबके लबो पर एक दिन तेरा ही नाम होगा,
हर कदम पे तेरे, दुनिया का सलाम होगा
हर मुसिबत का सामना करना तू डटकर
देखना समय एक दिन तेरा भी गुलाम होगा

........................................................................................................

नजर को बदलो, तो नजारे बदल जाते है,
सच को बदलो, तो सितारे बदल जाते है,
कश्तियाँ बदलने की जरुरत नहीं
दिशा को बदलो, किनारे खुद ब खुद बदल जाते है

........................................................................................................

बिना संघर्ष कोई महान नहीं होता
बिना कुछ किये जय जयकार नहीं होता
जब तक नहीं पडती हथौडे की चोट
तब तक काई पत्थर भी लोगों के लिए भगवान नहीं होता



# सोशल मिडीयाच्या विळख्यातील आजची तरुणाई

''हरवली आहे आजची तरुणाई
गुरफटली आहे फेसबुकाच्या जाळ्यात
विसरुन खरी-खुरी परिवर्तनाची लढाई
अडकली आहे व्हाटस्‌ॲपच्या नादात''

तरुण म्हटलं कि डोळ्यापुढे एकच चित्र पुढे येते. ते म्हणजे एक धगधगतं, सळसळतं तरुण रक्त ज्याच्यामध्ये लाथ मारेल तिथं पाणी काढण्याची ताकत असते. ज्याच्या जिभेतून निघणाऱ्या प्रत्येक शब्दाला धारधार शब्दाची पात असते, देश ज्याच्या खांद्यावर उदयाच्या विकासाची स्वप्ने पाहतो तो तरुण. तरुण म्हटले की, डोळ्यापुढे छान चित्र असं सुंदर स्वप्न घेऊन उभा असलेला तरुण. अशी ती तरुणाई. तरुण म्हटलं की घरातील सर्वांच लक्ष असतं. आमच्या घरातील तरुण माझ्यासाठी, माझ्या कुटुंबासाठी आणि माझ्या देशासाठी आजचा तरुण काय करतो आहे? या सर्व गोष्टीकडे सर्वांच लक्ष लागलेलं असतं. प्रत्येक व्यक्तीकडून काहीना काही अपेक्षा असतात. प्रत्येक व्यक्ती माझ्यासाठी हा तरुण काहीना काही करेल हा आशेचा किरण डोळ्यासमोर घेऊन या तरुण पिढीकडे पाहत असतो. खरं तर युवा या शब्दाचा अर्थच तीक्ष्ण धारेची तलवारच जणू. युवा म्हणजे एक असं हत्यार जे अतिशय तीक्ष्ण आणि धारधार आहे. ज्या हत्याराची धार कधीही बोथट होत नाही. आणि त्याच्या तीक्ष्ण धारेच्या जोरावर कुठली लढाई जिंकता येईल. असं एक हत्यार, या हत्याराचा ज्या देशाला उपयोग झाला त्या देशाने प्रगतीच्या दिशेने जोरात झेप घेतलेली आहे. त्यामुळे युवा या शब्दाला अनन्य साधारण महत्त्व दिले पाहिजे. आधीच्या काळात तरुण पिढी वडिलांना शेतीमध्ये मदत करायची. घाम गाळायंची त्याचबरोबर ते उत्तमरित्या शिक्षण पूर्ण करायंची, आणि त्या शेतीकरुन उत्तमरित्या आपल्या आयुष्यात सुखी राहायंची. पण आजचा तरुण काही न करता तो फक्त तासन् तास त्या मोबाईलच्या विळख्यात अडकून पडला आहे. तो तासन् तास मोबाईलच्या विळख्यात फुकटचा वेळ वाया घालतो आहे. डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम म्हणतात.......

आतुर वाऱ्यावर, स्वप्न तरंगत असतात
त्या वाऱ्याला नेहमीच घडवायचे असते
नवे युग, शक्तीचे युग
धगधगणाऱ्या अग्नीचे युग!

आजची तरुणाई त्या मोबाईलमध्ये इतकी वेडी झालेली आहे. की बस्सं, आधी लहानपणी सोलापूर ते पुणे प्रवास करताना, खूप छान वाटायचं. लहान असताना समोरच्यां सोबत छान गप्पा मारत जायचो. त्यामुळे पुणे कधी यायचं काही कळतचं नव्हतं. आता मात्र सर्वजण त्या मोबाईलच्या नादात कोणी कोणाशी बोलतचं नाही. मोबाईलच्या नादात माणूस माणुसकी विसरतं चालला आहे. मोबाईलच्या नादात एकमेकांमधील संवाद

कमी झाला आहे. त्याचंप्रमाणे मैत्रीणी-मैत्रीणी मधला संवाद कमी झाला आहे. आजकाल आई-वडिलांमधील संवाद कमी होत आहे. भाऊ-बहिर्णीमधला संवाद कमी होत आहे. आजकाल प्रत्येक जण त्या मोबाईलच्या जाळ्यात अडकला आहे. तरुणाई तर त्या पब्जी गेममध्ये इतकी वेडी झालेली आहे की त्यामुळे किती तरी जणांचे प्राण गेले. तरी त्या मोबाईलच्या विळख्यातून सुटायचा विचार ही तरुण पिढी करतचं नाही. मोबाईलच्या नादामुळे आपल्याला काय साध्य करायचं आहे तेच तर माणूस विसरत आहे.

असे म्हणतात की, माणूस शिक्षण घेतल्यानंतर चांगलं काय आणि वाईट काय हे समजू शकतो. मग मला सांगा माणूस मोबाईलच्या नादात का अडकला आहे. त्याला कळत नाही का? आपण मोबाईलचा वापर कशा पध्दतीने केला पाहिजे? आणि किती वेळ त्याला दिला पाहिजे? अहो, त्या मोबाईलमध्ये खूप काही फायदे आहेत. आपण मोबाईलद्वारे घरबसल्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची माहिती आपल्याला काही सेकंदात मिळून जाते. आपण घरबसल्या ठिकाणी लाईट बिल भरु शकतो. अनेक कामे आपण घरबसल्या जागी करु शकतो. त्या मोबाईलमधून आपल्याला जे काही चांगल्या गोष्टी आपण आत्मसात केलं पाहिजे. सर्वांच्या मोबाईलमध्ये गुगल ॲप असते. त्या ॲपमध्ये कोणत्याही प्रकारची माहिती आपण घरबसल्या जागी काही सेकंदात मिळवू शकतो. अशा अनेक चांगल्या गोष्टी आपण शिकल्या पाहिजेत, वाचल्या पाहिजेत. अनेक छान-छान व्हिडीओ आपण त्या यू-ट्यूबवर पाहू शकतो. आता तर विद्यार्थी सर्व अभ्यास मोबाईलच्या साहाय्याने करताना दिसून येतात.

असे अनेक प्रकारचे फायदे त्या मोबाईलमध्ये असताना मग आजचा तरुण का अडकला आहे? त्या फेसबुक आणि व्हाटस्ॲपच्या नादात का अडकला आहे? त्या फेसबुक आणि व्हॉटस्ॲपच्या नादात का अडकला आहे. त्या जीवघेणाऱ्या पब्जीच्या नादात. आहे! आजकाल लाखों मुलं तासनं तास त्या पब्जी गेममध्ये वाया का घालतो आहे. मोबाईल हे एक प्रकारचं व्यसन आहे. त्या मोबाईलचं व्यसन लागल्यानंतर ते सुटता सुटत नाही.

आजकाल कुठेही गेलं तरी नेहमी कानावर एकच विषय ऐकायला मिळतो. आपला देश पुढील काळात सर्वांत जास्त लोकसंख्येचा देश म्हणून ओळखला जाईल. लोकमान्य टिळकांनी शिवजयंती आणि गणेशोत्सव सुरु केले. कशासाठी तर शिवरायांचे विचार घरोघरी पोहचावे यासाठी पण आजचा तरूण काय करतो आहे. तर महापुरुषांच्या जयंत्या साजरा करतो. मोठमोठा आवाज करुन मिरवणुका काढतो, पण मिरवणूक काढून काय फायदा? मिरवणुक काढण्यापेक्षा त्या महापुरुषांचा विचार आचरणात आणून चांगला तरुण हा भारत भूमीसाठी तयार झाला तर त्या अर्थाने ती झाली खऱ्या अर्थाने जयंती साजरी. अशी जयंती साजरी केली तर महापुरुषांची जयंती केलेला आनंद वेगळाचं असेल. आजकाल जोरजोरात डीजे लावून दारु पिऊन नाचतात. अरे, महापुरुषांच्या जयंत्या आहेत ना मग त्यांचे विचार लोकांपर्यंत पोहोचवा. उगाच त्यांच्या नावावर दंगा आणि नाच कशा करता?

युवा एक सुरुवातीच्या बालपणी कच्चा धातू असतो. त्याला धारधार हत्यारासारखं तीक्ष्ण आणि सच्चा

देशभक्त बनविण्यासाठी त्याला, ज्याप्रमाणे धातू भट्टीमध्ये टाकतो त्या प्रमाणे ज्ञानरुपी भट्टीत टाकायचं असतं आणि ही ऊर्जा, ती अग्नी हत्यार बनेपर्यंत कमी पडू द्यायची नसते. मग बघा कसा आमचा युवा भरकटतो. तो मोबाईलच्या व्यसनात अडकतो. पण मुळात पाया कच्चा असेल तर पुढची पायरी आहे, पण युवा होण्याअगोदर जे बालपणातचं त्याला नीट संगोपन झालं तर तो नक्कीच उद्याचे शिवाजी महाराज, विवेकानंद, भगतसिंग झाल्याशिवाय राहणार नाही. आपला देश हा युवाशक्तीच्या बळावर जगात महाशक्ती बनणार आहे. म्हणून विवेकानंद म्हणतात.

''मला एक असा तरुण मिळवून दया की जो
शरीराने तंदुरुस्त आहे, त्याच्या इच्छा व विकार
त्याच्या ताब्यात आहेत, त्याचे मन आरशासारखे
पारदर्शक व स्वच्छ आहे, तर मी जगात
कोणत्याही प्रकारचा चमत्कार करुन दाखवेन''

स्वामी विवेकानंद म्हणतं होते कि मला फक्त १०० तरुण द्या मी त्या राष्ट्राचे भवितव्य घडवून दाखवतो त्याचं स्वामींच्या देशात अशा घटना घडतातचं कशा? का लागलं आजच्या तरुणाईला मोबाईलचं वेडं. आजचा युवक केस वाढवून त्यांना विशिष्ट आकार दिल्याने मी मॉडर्न होतो. असा आजच्या युवकांचा समज आहे. पण मला सांगा ''केस वाढवून देवानंद होण्यापेक्षा, विचार वाढवून विवेकानंद व्हा'' असं माझं स्पष्ट मत आहे.

भारताचे स्वप्न कलमांनी याचं तरुणांच्या जीवावर पाहिलं असताना आजची तरुणाई मात्र भरकटली आहे. एकीकडे महासत्तेच्या जवळ पोहोचणारा भारत दुसरीकडे मात्र तरुण पिढीला दूर लोटतोय की काय, असा प्रश्न पडतोय. वेळ बदलतील, काळ बदलेलं तसे दुनियाही बदलली. पाश्चात्य देशांच अनुकरण करताना आमची तरुणाई मात्र स्वतःच्या देशाची आदर्श संस्कृती विसरत चालली आहे. इंटरनेटने जग जवळ आले. मात्र माणसातील माणुसकी मात्र संपत चालली. संवेदना हरवलेली तरुणाई त्या मोबाईलच्या विळख्यात अडकली आहे. जात, पात, धर्म यात अडकलेली तरुणाई कसला आणि काय देशाचा विकास करणार असा केविलवाणा प्रश्न पडतोय. ज्या आईवडिलांनी जन्म दिला लहानाचे मोठे केले. त्याचं आईवडिलांना घराबाहेर काढणारी तरुणाई एक दिवस या देशाचे वाटोळे करणार असे दिसते. मग नका अडकू त्या मोबाईलच्या विळख्यात. का विसरत आहे आजची तरुणाई सर्व भारतीय संस्कृती? नका पडू या मोबाईलच्या जाळ्यात.

''विसरुन गेले का संस्कृतीपार
कुठे गेले ते वाडवडिलांचे संस्कार
नको त्या विकृतीला बळी पडू
कसे करतात हे सामूहिक बलात्कार''

चला तर मग आपल्या भारताला चांगल्या दिशेकडे नेऊ. आपल्या देशाचा इतिहास आहे. जेव्हा जेव्हा

देशात संकट आली. तेव्हा तरुण एक झाले आणि संकट परतावून लावली. संत ज्ञानेश्वर, शिवाजी महाराज, संत रामदास स्वामी, मंगल पांडे, भगतसिंग, विवेकानंद, सावरकर, आंबेडकर यांच्याकडे पाहिलं की जाज्वल्य इतिहासाचा अभिमान वाटतो. पण आज मात्र खूप वाईट वाटतंय की थोर महापुरुषांच्या इतिहास घेऊन जगणारी आजची पिढी इतकी कशी भरकटली. आजच्या तरुण पिढीला तरुण म्हणायला पण लाज वाटतेय. कारण आजची तरुणाई दिसते ती दारु, गांज्या, गुटखा, सिगारेट आणि नवीन व्यसन म्हणजे तो मोबाईल. मग! प्रश्न पडतोय की खरचं आजची तरुणाई आहे कुठे? अशा अनेक गोष्टी आजच्या शिकलेल्या तरुणाला सांगावं का?

''शोधतोय मी त्या तरुणाईला
जी पेटून उठेल अन्यायाला
दाखवून देईल साऱ्या जगाला
करु देणार नाही अन्याय कुणाला''

या लेखन प्रपंचातून मला फक्त एकच साध्य करायचं आहे. मोबाईल वापरा. पण त्या मोबाईलचा उपयोग चांगल्या कामासाठी करा. चांगल्या गोष्टीसाठी करुया. मोबाईलच्या नादात आपली संस्कृती विसरु नका. आपल्या आईवडिलांनी दिलेले संस्कार सोबत घेऊन. चला तर मग सोशल मिडीयाच्या विळख्यातून सुटून जाऊ.... सर्वांचे विचार सोबत घेऊन भारत देश महासत्ताक करु......

कु. काजल देवकर
बी.कॉम. भाग-३

## विनोद

रमेशचा भाऊ सुरेश खूप दिवसांनी घरी येतो.

रमेश : दादा, हे बघ मी आपल्या कुत्र्याला मराठी बोलायला शिकवलं

सुरेश : गप रे, काही पण बोलतोस

रमेश : अरे हो तुला पहायचं का?

सुरेश : दाखव

रमेश कुत्र्याला म्हणता : ''सांग रमेश माझा कोण?''

कुत्रा बोलतो, ''भाऊ....भाऊ.....भाऊ''

आंटी : अरे तू लग्न कधी करणार आहेस?

मी : मला एक मोठा भाई आहे आधी त्याचे होऊ दे मग मी करणार

आंटी : अरे तुला तर एक पण भाई नाहीये

मी : सलमान भाई





# इंडिया २०२०

'इंडिया २०२०' इस शब्द को सुनते ही सबके आगे सिर्फ एक ही चेहरा आता है, वो हे हमारे जानेमाने शिक्षक-वैज्ञानिक भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम। उनका पूरा नाम डॉ. अबुल पाकीर जैनुलबदीन अब्दुल कलाम है। उनका जन्म १५ ऑक्टोबर १९३१ में रामेश्वरम, तामिळनाडू में हुआ था। वो हमारे देश के ११ वे राष्ट्रपती थे । आज भी उन्हें लोग प्यार से ' Peoples president' और ' The Missile Man of India' कहते है ।

डॉ. कलाम सब बच्चों के पसंदीदा शिक्षक रहे है। वो हमेशा अलग-अलग स्कूल, कॉलेजों में जाकर बच्चों से मिलते और उनसे बात करते थे। उन्होंने ISRO और DRDO में भी काम किया है। उनके निगरानी में इंडिया SLU3, Rohini, Nuclear Test भी किए है। उनके प्रचलित किताबों के लिए जैसे कि अग्निपंख (Wings of fires) और इंडिया २०२० उन्हें बहुत सारे पुरस्कार मिले है।

इंडिया २०२० - अ व्हिजन फॉर दी न्यू मिल्यानिअम इस किताब मे उन्होंने इंडिया को विकसित देशों में गणना किए जाने के लिए क्या करना चाहिए इसके बारे में अपना अपना मत व्यक्त किया है। उन्होंने कृषी क्षेत्र, तंत्रज्ञानविषयक क्षेत्र, शिक्षा क्षेत्र, माहिती तंत्रविषयक क्षेत्र आदि. क्षेत्रों का विकास होना जरुरी है। इसलिए हमारे देश में किस तरह के बदलाव की जरूरत है, वह उन्होंने 'इंडिया २०२०' इस किताब में लिखा है।

* इंडिया २०२० में बताए गए कुछ महत्त्वपूर्ण बदलाव

१) डॉ. कलाम जी ने व्हिजन इंडिया २०२० में बताया है की, हमारे देश में ग्रामीण और शहरी क्षेत्रों में भेद होता है, जैसे ग्रामीण क्षेत्र में शहरी क्षेत्रों से कम विकास हुआ है। ऐसे नहीं होना चाहिए। हमारे देश के सारे शहरों में और ग्रामीण भागों में सारे क्षेत्रों में विकास होना जरुरी है।

२) हमारा देश ऐसा देश होना चाहिए जिसमें किसी भी तरह की बिजली या शुध्दपानी की कमतरता ना हो।

३) हमारे देश के सारे क्षेत्र यानी कृषी, औद्योगिक और सेवा क्षेत्र एक साथ काम करें।

४) शिक्षा क्षेत्र में किसी भी तरह का भष्ट्राचार ना हो।

५) हमारा देश एक ऐसा देश हो जहाँ सारे होशियार, वैज्ञानिक और संशाधेक देश के उन्नती के लिए काम करें।

६) हमारे देश में अच्छे स्वास्थ संबंधित सेवा उपलब्ध हो।

७) हमारा देश ऐसा देश हो जहाँ की सरकार अपना काम किसी भी तरह के भष्ट्राचार से नहीं करती हो।

८) हमारा देश ऐसा देश हो, जहाँ की गरीबी, अशिक्षितता, महिलाओं और बच्चो पर होनेवाले अत्याचार पूरी तरह से खत्म हो जाए और कोई भी खुद को अकेला ना समझे।

९) हमारा देश पूरी तरह से संपन्न, स्वास्थपूर्ण, सुरक्षित, आतंकवादीयों से दूर, शांतताप्रिय, सुखी और हमेशा

सफलता के मार्ग पे जानेवाला हो।

१०) हमारा देश दुनिया की सबसी अच्छी जगह हो और हमें हमारे सरकार पर गर्व हो।

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जी ने आय.आय.टी. हैद्राबाद से उनके तीन मुख्य व्हिजन बताये है। पहला व्हिजन देश की स्वतंत्रता है। दूसरा व्हिजन भारत देश विकसित देशों में शामील होना चाहिए और तिसरा व्हिजन भारत देश हर तरह से संपन्न देश हो, जिसका पूरे दुनिया में मान सम्मान हो। वो चाहते थे की, हमारे देश की शिक्षण संस्थाए, संवेदनशील, पारदर्शी हो और विद्यार्थीओं को सहाय्यता करनेवाले हो।

इंडिया २०२० में कलाम जी ने कहा है की, २०२० साल मे हमारा देश विकसित देश बन जाएगा क्योंकि २०२० साल मे हमारे देश के युवकों के हाथ मे सारे देश के काम सोप दिए जाएंगे। और हमारे देश के विद्यार्थी और युवक ही है जो हमारे देश का प्रतिनिधित्व कर सकते है। उन्होंने इस संदर्भ में ये भी कहा है कि २०२५ साल में चायना से भी ज्यादा हमारे देश की जनसंख्या होगी। वो ज्यादा युवा शक्ती से भरी होगी। एक करोड से भी ज्यादा लोग कामगार संघटनाओं मे जुड जाएँगे। मध्यमवर्गीय लोगों की संख्या ६ करोड से १ अब्ज तक हो जाएगी।

पर क्या सच मे हम 'इंडिया २०२०' मे बताए गए व्हिजन पर चल रहे है? जब हम इसके बारे मे सोचते है, तो हमे लगता है कि हाँ हम उस मार्ग पे चल रहे है पर सच कहूँ तो मुझे लगता है कि अब तक तो हमारा देश विकसित हो जाना चाहिए था। हमारा देश कुछ क्षेत्रो मे बहोत आगे गया है, पर साथ ही साथ कुछ क्षेत्र ऐसे भी है, जो अभी तक बदलाव से बहुत दूर है। इसलिए हमे पहले उन कम विकसित क्षेत्रों का विकास करना होगा।

उन कम विकसित क्षेत्रों के विकास के लिए सरकार के साथ लोगों को भी कोशिश करनी होगी। सब मिलकर काम करेंगे तो ही हमारा देश आगे बढेगा। हमारे देश मे होने वालों बच्चों और महिलाओं पर के अत्याचार कम करने के लिए बेकार लोगों को काम देना जरुरी है। किसानों की आत्महत्या कम करना है, तो उन्हे खेती के लिए प्रोत्साहित करना चाहिए और उन्हें जरुरत पडे तब मदद करनी चाहिए। उनके उत्पादनको योग्य भाव मिलना चाहिए। हमारे देश को युवा पिढी के हातों मे सोपना है इसलिए युवा पिढी ने भी अपने अच्छे-बुरे के बारे में सोचकर अपना भविष्य उज्ज्वल बनाने के लिए स्वयं पुढाकार से काम करना चाहिए।

हमारा देश विश्वविख्यात होने के लिए सभी लोगों को, सरकार को और खास करके युवा पिढी को एक साथ काम करना होगा। शायद तभी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जी का 'व्हिजन इंडिया २०२०' पूरा होगा।

कु. प्रणाली तांदळे,
बी.कॉम. भाग-२



# ‘आत्मविश्वास : एक जीवनसाधन’

सर्कस पाहायला गेल्यानंतर आपण अनेक प्राणी पाहतो. त्यामध्ये हत्ती, घोडा, ससे, सिंह यासारखे अनेक प्राणी पाहिले. आश्चर्य याच वाटत होत कि चार-पाच हत्ती एकाच झाडाला लहान दोरखंडाने बांधलेली होती. प्रश्न असा होता की, छोट्याशा दोरखंडाला यांनी एक जरी झटका मारला तर त्या दोऱ्या तुटून जातील.

मी महावतला म्हणाले,‘‘काय तुम्हांला असे वाटत नाही, की इतक्या मोठ्या हत्तींना एवढ्या छोट्या झाडाला व एवढ्या छोट्या दोऱ्याने बांधून ठेवता येणार नाही! ते कधीही तोडून निघून जातील!’’

महावत हसला आणि म्हणाला,‘‘असे काही नाही हे हत्ती जेव्हा लहान होते तेव्हापासून यांना अशाच दोरखंडानी बांधत आली होती. तेव्हा वारंवार प्रयत्न करुनही दोऱ्यांना तोडू शकत नाहीत. आता जरी हे या दोऱ्यांना तोडू शकत असले तरी विश्वास गमावल्यामुळे ते तसा प्रयत्न करताना दिसत नाहीत.’’ मला याचं आश्चर्य वाटलं की एवढा बलाढ्य प्राणी केवळ यासाठी बंधनात अडकलेला आहे कारण याचा विश्वास बसला आहे कि आपण या बंधनातून मुक्त होऊ शकत नाही. म्हणूनच विश्वास फार मोठी गोष्टी आहे. ‘‘विश्वासी फलदायकः।’’ जसा विश्वास तसे फळ मिळते. आपण जसा मनात निश्चय करतो तसेच होवू लागते.

अगदी हत्तीप्रमाणेच आपल्यापैकी अनेक लोक केवळ सुरुवातीच्या अपयशामुळे खचून जातात व असे मानतात की, आता माझ्याकडून हे काम होवूच शकत नाही आणि स्वतःच बनविलेल्या मानसिक बंधनात अडकून सर्व आयुष्य घालवितात. जर आपण मनात दृढ निश्चय केला असेल की, ‘‘मी हे करुच शकत नाही.’’ तर तुम्हाला साक्षात ब्रह्मदेव जरी आला; तरी तुमची काही मदत करु शकणार नाही. लक्षात ठेवा अपयश ही यशाची पहिली पायरी आहे. अपयश हे जीवनाचे प्रेरणास्थान आहे. चुकीच्या मान्यतांना तत्परतेने बाहेर काढाल, दुर्बल विचारांना शोधून बाहेर काढाल आणि तत्परतेने कार्य कराल तर यश जरुर मिळेल.

जर या गोष्टीचे आपण चिंतन केले तर; आपल्याला असे लक्षात येईल की, ताकदवान असणारा हत्ती केवळ विश्वास गमावल्यामुळे बंदीवान राहतो तर केवळ विश्वासाच्या जोरावर आपण आपल्या जीवनातील लक्ष्य गाठू शकतो.

बिजामध्ये वृक्ष निर्मितीचा गुण असतो. त्याला योग्य वातावरणाची गरज असते. ही गरज जर पूर्ण करता आली तर आजचा प्रत्येक विद्यार्थी हा जीवनात यशस्वी होईल.

चि. विनायक म्हेत्रे,
बी.एस्सी. भाग-३



# कोरोना आव्हानाला सामोरे जाताना.....

कोरोनानंतरचे जग वेगळे असणार आहे, हे आता हळूहळू स्पष्ट होऊ लागले आहे. जगभरातील कंपन्या आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संस्थांनी या नव्या जगाचा अंदाज बांधण्यास सुरुवात केली आहे. माणसा-माणसांमधील नात्यांपासून, देशादेशांमध्ये असणाऱ्या आंतरराष्ट्रीय संबंधापर्यंत अनेक समीकरणे कोरोनानंतरच्या जगात हळूहळू बदलत जातील. असे संकेत मिळू लागले आहेत. त्याबद्दल सर्वत्र लिहिले जाऊ लागले आहे. या सगळ्या बदलत्या जगाचा व्यवहार ज्या भाषेत चालणार, त्या भाषेबद्दलचा विचारही म्हणूनच महत्त्वाचा ठरतो. हे अधिक स्पष्ट व्हावे यासाठी आपण एक सोप्यात सोपे उदाहरण घेऊ. 'वर्क फ्रॉम होम' हा कोरोनामुळे दिसलेला प्रमुख दृश्य बदल आहे. आजवर कधीही केले नाही, अशी घरुन काम करण्याची वेळ आज अनेकांवर आली आहे. पण हा बदल तात्पुरता नसून, आता हीच कार्यपध्दती कायमची करता येईल का, याचा जागतिक पातळीवर विचार होतो आहे.

टीसीएस (टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिस) सारख्या कंपन्यांनी २०२५ पर्यंत आपले ७५ टक्के कर्मचारी घरुन कसे काम करतील, या दिशेने कामही सुरु केले, जगभरात हे होत आहे. अनेक शाळा-महाविद्यालयांनी 'लर्न फ्रॉम होम' सारख्या घोषणा करत शिक्षणही ऑनलाईन करायला सुरुवात केली आहे. याचाच अर्थ माणसे अधिकाधिक वेळ घरी राहणार आहेत. घरी असलेली माणसे घरातील लोकांशी प्रत्यक्ष आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमातून जगाशी अप्रत्यक्षरित्या संवाद साधणार आहेत. त्यांच्या या घरातील आणि जागतिक संवादाची भाषा कदाचित वेगवेगळ्या असू शकतील. 'मातृभाषा या स्वयंपाकघरात बोलण्याच्या भाषा उरतील' असे भाष्य ज्येष्ठ कानडी लेखक शिवराम कारंथ म्हणत असत. पण त्यांचे हे भाष्य अशा संदर्भात प्रत्यक्षात येईल याची कदाचित त्यांनाही कल्पना करता आली नसेल. त्यामुळे माणसाच्या आयुष्याची दिशा जशी बदलणार आहे. तसाच हा भाषा व्यवहार ही बदलणार आहे. याची तयारी सर्वांना करावी लागेल. किंबहुना ज्या भाषा ही तयारी करतील त्याच टिकतील, असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. समजा, जर भविष्यात शाळांमधील वर्गांमध्ये शिकविले जाणारे शिक्षण हे ऑनलाईन पध्दतीने कायमचे होऊ लागले. त्यासाठी विविध प्रकारचे ऑनलाईन साहित्य निर्माण करावे लागतील फक्त पाठ्यपुस्तके पीडीएफ करुन हे काम होणार नाही. त्यासाठी डिजीटल माध्यमांसाइी मातृभाषेतील मजकूर (कंटेन्ट) तयार करावा लागेल. तो मजकूर फक्त शब्दस्वरुपात नसेल तर तो मल्टिमिडीया, खेळ (गेम्स) च्या स्वरुपात असले.

कोरोनासारख्या साथी याआधीही या जगाने पाहिल्या आहेत. पण कोरोनाची साथ वेगळी आणि अधिक विश्वव्यापी ठरली याची दोन कारणे आहेत. एक म्हणजे दळणवळणाचा वेग आणि माहितीच्या प्रसारणाचा वेग. हे दोन्ही वेग आजवरच्या मानवी इतिहासातील सर्वोच्च पातळीवर आहेत. त्याचा भाषा म्हणून काय करायला हवे, या अनुषंगाने सातत्याने विचार आणि कृती व्हायला हवी. पहिल्यांदा आपण दळणवळणाबद्दल समजून घेऊ. आज आपल्याला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी दहा

वर्षांपूर्वी जवेढा वेळ लागत होता, त्यापेक्षा कमी वेळ लागतो आपण त्या ठिकाणी लवकर पोहचू शकत आहोत. त्यामुळेच चीनवरून संपूर्ण जगभर हा रोग पसरायला काही महिन्याचाच काळ लागला. हा रोग एवढा पसरला कि, जगाला टाळे लावून बंद करावे लागले. आजवरच्या ज्ञात इतिहासातील ही पहिलीच वेळ आहे. जर दळणवळणाचा हा वेग नसता. तर हा रोग एवढा पसरला नसता. म्हणूनच हा रोग रोखण्यासाठी पहिल्यांदा दळणवळण बंद करण्यात आले. माणसांनी एक विशिष्ट भागाच्या बाहेर पडू नये, म्हणून अख्या जगात माणसांना एका ठराविक जागेत स्थानबध्द करण्यात आले. आता हे भौतिक दळणवळण थंडावले. पण डिजीटल दळणवळण म्हणजे माहितीचा वेग प्रचंड वाढला. कोरोनाचा प्रसार होण्यापूर्वीही तो वाढलेलाच होता. पण कोरोना काळात तो त्याच्या शिखरावर पोहोचला आहे. तो आणखीही वाढणार आहे. कोरोनानंतर भौतिक दळणवळण पुन्हा सुरु होईल. पण त्यासोबत माहितीचा वेगही वेगवेगळ्या स्वरुपात व्यक्त होत जाईल. आजपर्यंत 'तेल' हे जगाचे चलन होते, पण भविष्यात तेलासोबतच डेटा हे जगाचे नवे चलन असणार आहे. भौतिक दळणवळणासाठी 'तेल' आणि 'डिजीटल' दळणवळण म्हणजे माहितीच्या वेगासाठी 'डेटा' हे सूत्र मानवी व्यवहाराचा आधार ठरणार ओ.

वास्तविक पाहता, लॉकडाऊन उठवल्यानंतरच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी आपण आतापासून मानसिक तयारी करणे गरजेचे आहे. गावाकडून शहराकडे स्थलांतरित झालेले युवक कुटुंबासहित शहरात रुळलेले आहेत. त्यांच्या बायका-मुलांना शहरी व्यवस्थेची सवय लागलेली आहे. १०-१५ वर्षांपूर्वी गाव सोडताना ज्या सोयीसुविधा गावात उपलब्ध नव्हत्या त्या आता गावात उपलब्ध आहेत. गावात मोटारसायकल, मोबाईल, केबल टी.व्ही., पाणी पुरवठा, रस्ते, घरांचे बांधकाम, शाळा, महाविद्यालये, बाजारपेठा, दवाखाने इ. सर्व गोष्टी यांची तुलनात्मक वाढ दिसून येते. परंतु हे सर्व सुख उपभोगण्यासाठी या युवकांकडे रोख पैसे असणे गरजेचे आहे, आणि ही गरज छोट्या-मोठ्या उद्योगांमुळेच पूर्ण होऊ शकते.

संपूर्ण जग अविश्वासाच्या नजरेने चीन या देशाकडे पाहत आहे. या पार्श्वभूमीवर भारताने सर्वच क्षेत्रांत घेतलेली आघाडी, विशेषतः आय.टी. क्षेत्र आणि सर्वात महत्त्वाचे 'वसुधैव कुटुंबकम्' म्हणजेच संपूर्ण जग, मानवजात हे एक जागतिक कुटुंब ही भारताची विचारसारणी, आदी गोष्टींमुळे संपूर्ण जग भारताकडे विचारपूर्व आशेने पाहत आहे. आपल्या या जागतिक कुटुंबाला हानी पोहचेल अशी कोणतीही कृती भारताने विश्वासपूर्व हजारो वर्षात केलेली नाही व यापुढेही करणार नाही. भारतातून हजारो शास्त्रज्ञ, अभियंते आणि डॉक्टर सगळ्या जगात पसरत आहेत. या प्रक्रियेस आता जास्त वेग येण्याची शक्यता दिसून येत आहे. जगात कोणत्या क्षेत्रात कोणत्या प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता आहे, त्याचा अभ्यास करून आपली राष्ट्रीय स्तरावरची धोरणे आखणे गरजेचे आहे. त्यासाठी लागणाऱ्या प्रशिक्षण संस्था, महाविद्यालये, विश्वविद्यालयामधील अभ्यासक्रमांमध्ये दुरुस्त्या सुचविणे अत्यंत आवश्यक आहे.

- कु. ज्योत्सना धनवडे
बी.एस्सी. भाग-२



# कविवर्य कुसुमाग्रज

गगनापरी जगावे, मेघापरी मरावे,
तीरावर नदीच्या, गवतातूनी उरावे

माता सरस्वतीच्या मंदिरातील दिव्य रत्न, माणसाला ईश्वराच्या हवाली न करता माणसाच्याच मनात ईश्वरता जागविणारा एक थोर कवी. माणसातील माणुसकीचे आणि ईश्वरतेचे आपल्या साहित्यातून अखंड पूजन करणारा तपस्वी कवी, निराशेच्या अंधःकारात आशेच्या उल्का पेरून, नवतेजाचे स्फुलिंग चेतविणारा महान ऋत्विज, मराठी सारस्वताला आपल्या प्रतिभेच्या आणि प्रज्ञेच्या मंगलमय किरणांचा आल्हाददायक प्रकाश देणारे महाकवी कुसुमाग्रज..!

कुसुमाग्रजांचे पूर्ण नांव श्री. विष्णू वामन शिरवाडकर असे होते हे आपण जाणतोच. कुसुम या त्यांच्या बहिणीचे मोठे बंधू म्हणून कुसुमाग्रज. 'कुसुमाग्रज' या नावाने त्यांनी काव्यलेणी कोरली. लेखक वि. वा. शिरवाडकर आणि सामाजिक बांधिलकी जपणारे तात्यासाहेब. माणसाच्या मैफिलीत रमलेल्या एकाच व्यक्तीची ही तीन रुपे. २७ फेब्रुवारी १९१२ रोजी जन्मलेले कुसुमाग्रज ज्यांनी ऐन तीशीतच 'विशाखा' या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून प्रसिध्दीचा सूर्योदय पाहिला. या काव्यसंग्रहावर मराठी रसिकांनी मनापासून प्रेम केले. अक्षरशः पूर्ण काव्यसंग्रह पाठ असणारे अनेक रसिक आजही सापडतील. राष्ट्रीयता, समाजभिमुखता, उत्कटता, चिंतनशीलता, कल्पनावैभव, रेखीव-प्रमाणबध्द रचना ही त्यांच्या सर्वच प्रकारच्या लेखनाची वैशिष्ट्ये होत.

'अनंत आमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा किनारा तुला पामराला' किंवा 'गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार' असे तेजस्वी शब्द वापरुन त्यांनी मनामनात जसा जोश भरला. 'पृथ्वीचे प्रेमगीत', 'काढ सखे गळ्यातील तुझे चांदण्याचे हात...' अशी तरल, विलक्षण हळूवार कविता रचून प्रेमाचा संदेश मराठी रसिकापर्यंत पोहोचवला. 'रात्रीच्या गर्भात उदयाचा असे उषःकाल' या काव्यपंक्ती पारतंत्र्याची बंधने तोडून क्रांतिकाराकांच्या आंतरिक सामर्थ्याला साद घालतात. तमाम मराठी रसिकांना कधी 'नटसम्राट' मधील आप्पा बेलवलकर भावले तर कधी सरदारांच्या पराक्रमाची गाथा गाणाऱ्या 'सात' या कथाकाव्यातून तरी कधी विषण्ण मनाने दुखावलेल्या 'जालियनवाला बाग' या काव्यातून ते काळजाला भिडले. 'स्वातंत्र्यदेवतेची' विनवणी रचून भारतमातेची व्यथा जनतेसमोर मांडली. लोकांच्या डोळ्यात अंजन घातले. 'वेडात मराठी वीर दौडले सात' ह्या कवितेमधून त्यांनी अक्षरशः शौर्यरुपी इतिहास जिवंत केला.

सामाजिक विषमता व अन्यायांवर त्यांच्या लेखणीने कठोर प्रहार केला. 'साहित्यिकाने सामाजिक बांधिलकी मानली पाहिजे' या मताचे ते पुरस्कर्ते होते आणि ते त्यांनी आपल्या कृतीमधून व लेखनातून वारंवार प्रकट केले. सामाजिक कविताबरोबरच देशभक्तीपर कविता, प्रेम-विरहपर कविता, आध्यात्मिक आशयाच्या कविता, निसर्गकविता असे सर्वच कविताप्रकार त्यांनी हाताळले आहेत. त्यांच्या लेखनाला

कारुण्याची झाक आहे. कुसुमाग्रजांची मानवतेवर असीम श्रध्दा होती. आपल्या शब्दज्योतींनी त्यांनी मानवी मनातले अग्निकण फुलविले. माणसातल्या सत्याचे, शिवाचे, सुंदरतेचे दर्शन घडविले.

''बोले तैसा चाले। त्याची वंदावी पाऊले।।''

या उक्तीप्रमाणे कुसुमाग्रजाचे जीवन आणि साहित्य यात अद्वैत आहे. आजच्या समाजरचनेच्या कुजलेल्या अंतरंगाचे भेदक चित्रण करणारी त्यांची प्रतिभा कल्पक आहे, निर्णायक आहे. 'जीवनलहरी' ते 'मुक्तायन' पर्यंतचा काव्यप्रवास. 'दूरचे दिवे, दुसरा पेशवा' ते 'नटसम्राट' हा नाट्य प्रवास. 'वैष्णव ते कल्पनेच्या तीरावर' हा कादंबरीचा प्रवास आणि अनेक कथासंग्रह असा विविधरंगी प्रवास त्यांनी केला. जी मंडळी आज सावलीत आहेत त्यांनी उन्हात तिष्ठत राहणाऱ्या लोकांसाठी काही केले पाहिजे. ज्यांचे ताट भरले आहे, त्यांनी त्यांच्या ताटात काही नाही अशा लोकांच्या ताटात काही टाकले पाहिजे, या विचारांचे ते व्यक्ती होते. 'तुरुंग एक अशी जागा आहे तिथे भूतकाळ विसरायचा असतो' या भावनेने त्यांनी तुरुंगातील कैद्यांसाठी वाङमय मेळावा भरविला.

कविवर्य कुसुमाग्रज यांच्या या लेखनसेवेचा यथोचित गौरव अनेक मानसन्मानामधून त्यांना मिळाला. त्यांच्या साहित्यकृतींचा गौरव करण्यात आला. मराठी साहित्य अकादमी पुरस्कार, पुणे विद्यापीठाची डी.लीट पदवी, ज्ञानपीठ पुरस्कार, टपाल तिकिटाचे अनावरण असा बहुमान मिळविणारे पहिले साहित्यिक व इतर बरेच पुरस्कार व गौरव ह्या महाराष्ट्रभूषण महान व्यक्तीची गौरवगाथा सांगतात. २७ फेब्रुवारी हा कुसुमाग्रजांचा जन्मदिवस 'जागतिक मराठी भाषा दिवस' म्हणून साजरा केला जातो.

''कशास आई भिजविसी डोळे, उजळ तुझे भाल
रात्रीच्या गर्भात उदयाचा असे उषःकाल।''

उदंड आशावाद आणि तितकाच प्रखर आत्मविश्वास ही कुसुमाग्रजांच्या लेखणीची वैशिष्टयेच...! कुसुमाग्रज म्हणजे साहित्यसृष्टीसाठी एक अभेद्य तारा आहेत. त्यांच्या कविता म्हणजे एकेक हिरे, माणिक आणि पाचूच! ज्यांना ते वाचायचे, समजायचे, वेडावून गेल्याचे भाग्य मिळाले ते खरे नशीबवान! कुसुमाग्रजांच्या रुपाने मराठी साहित्याचा आणि संस्कृतीचा मानदंड महाराष्ट्राला लाभला असे मानले जावे ते उचितच आहे. प्रकाशाचे वेड असलेला हा आदर्श कविवर्य नक्षत्ररुपाने साऱ्या जगालाच प्रकाश देत राहील अगदी जगाच्या अंतापर्यंत.....!

कु. श्रृती पाटील,
बी.एस्सी. भाग-१



# ऑनलाईन शिक्षण व्यवस्था - फायदे व तोटे

'शिक्षण हे वाघिणीचे दूध आणि ते प्यायल्यावर माणूस गुरगुरायला लागतो' असे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे. या वाक्यात बराच मोठा अर्थ दडलेला आहे. आपल्यासारख्या विकसनशील देशात आज ज्या काही रोजगाराच्या संधी आहेत, त्यामागे आपल्या शिक्षण पध्दतीचा मोठा वाटा आहे. तसेच माणसाच्या परिवर्तनाचे शेवटचे न्यायासन म्हणजे 'शिक्षण' आणि शिक्षण घेता आले नाही तर? म्हणून या साऱ्यावर मात करण्यासाठी ऑनलाईन शिक्षण पध्दतीचा मोठ्या प्रमाणात चांगला वापर होऊ शकतो.

भारतात ऑनलाईन शिक्षण हे आज प्राथमिक अवस्थेत आहे. त्या मानाने परदेशात ऑनलाईन शिक्षण घेण्याकडे जास्त कल आहे. ऑनलाईन शिक्षणाचे प्रमाण भारतात खूप कमी प्रमाणात असले तरी, अधिकाधिक शैक्षणिक संस्थांनी प्रवेश प्रक्रिया आणि निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया ऑनलाईन करण्याची पध्दत आत्मसात केली असली तरी ऑनलाईन शिकविण्याची पध्दत खूप कमी आहे. अनेक संस्था, कॉलेज त्यांच्या परिक्षा ऑनलाईन घेत आहेत. याचा पाढा अनेक शिक्षण संस्थांनी गिरवण्यास हरकत नाही.

आता या 'कोरोना' संसर्गजन्य काळात शिक्षणात व नोकरीमध्ये खंड पडू नये म्हणून ऑनलाईन शिक्षण पध्दतीचा वापर करीत आहेत. कोरोनानंतरच्या जगात शिक्षण क्षेत्रासमोर बरीच आव्हानं असणार आहेत. ऑनलाईन शिक्षणासोबतच इतर नवनवीन पर्याय शोधण्याचा जेणेकरुन अधिकाधिक विद्यार्थी शिकू शकतील, प्रयत्न शिक्षण क्षेत्रातील व्यक्तींना करावा लागणार आहे. शिक्षणावर केला जाणारा खर्च असतो, ती गुंतवणूक नसते, अशी आपल्या समाजाची मानसिकता बदलणे अत्यंत आवश्यक आहे.

उच्च शिक्षणासाठी अनेकदा आपण बाहेरगावी जातो. तसेच आपण तिथे शिक्षण घेत असतो. जे शिक्षण आपल्याकडे उपलब्ध नाही ते घेण्यासाठी आपण बाहेरगावचा रस्ता पकडतो. उदा. पुणे, मुंबई, बेंगळुरु, दिल्ली यासारख्या ठिकाणी अनेक कोर्सेस, शाळा, कॉलेज आहेत, ज्यासाठी आपल्याला तिथे जाऊन शिकावे लागते. यासाठी पैसा, वेळ आणि राहण्याची सोय अशा प्रत्येक गोष्टींचा विचार करावा लागतो. अनेक जण तर परदेशी जाऊन शिक्षण घेतात. परंतु, सर्वांना हे परवडत नाही. पण शिक्षण तर घ्यायचे आहे पण आर्थिक परिस्थितीमुळे घेता येत नाही. अशी वस्तुस्थिती सर्वच जणांची असते. या सगळ्यांवर मात करण्यासाठी आपल्या सर्वांसमोर ऑनलाईन शिक्षण पद्धत हा पर्याय खुला आहे. ऑनलाईन शिक्षण हे नवीन पिढीचे साधन आहे.

'' नवनविन शिकण्यासाठी आता ऑनलाईन दुवे आहेत,
शिकण्यासाठी खूप आहे मात्र शिकणारे हवे आहेत,
वेग-वेगळ्या ऑप्शनसह वेग-वेगळे फिचर आहेत,

नव-नविन शिकायला ऑनलाईन पध्दती आहेत....!!!''

सध्याचे युग इंटरनेटचे आहे, हे आपल्याला माहीत आहे. व्हॉटसअॅप, फेसबुक, इंस्टाग्राम हे प्रत्येक स्मार्ट फोनमध्ये असते. स्मार्ट फोनचा वापर जर आपण आभ्यासासाठी केला तर, बरेच ऑनलाईन ज्ञान आपल्याला घरबसल्या मिळू शकते. त्यामध्ये आपण कुठेही असलो तरी, आपल्या वेळेनुसार, घरबसल्या आणि कमी खर्चात हवे ते शिक्षण घेता येते आणि वेगवेगळे कोर्सेस सुध्दा करता येतात. तसेच आपल्याला ऑनलाईन सर्टिफिकेट पण मिळते आणि विशेष म्हणजे एखादी गोष्ट समजली नसेल, तर ती पुन्हा बघण्यासाठी उपलब्ध साहित्य मिळते. त्यामधून आपण व्यवस्थित शिकू शकतो. या शिक्षणात अभ्यासक्रम हे पार्ट टाईम, फुल टाईम इंटरनेट, इंट्रानेट अथवा एक्स्ट्रानेट मार्फत शिकवले जाते. जगातील विद्यार्थ्यांशी देवाण-घेवाणीच्या आणि संभाषणाच्या एकमेव क्षमतांचा फायदा विद्यार्थ्यांपर्यंत पुरवला जातो. व्हिडीओ, चर्चा, प्रश्न-उत्तरे, ऑनलाईन संभाषण यासारख्या गोष्टी घरबसल्या आपल्याला कॉम्प्युटर अथवा स्मार्ट फोनद्वारे करता येतो.

सध्या शिक्षण पद्धतीत गुगलचा वापर करत नाहीत, अशी व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. गुगलचे महाजाळे जगभर पसरले आहे. जगातील कुठलीही माहिति एका क्लिकवर आपल्याला गुगलवर भेटते. या माध्यामातून शिक्षणाचे आपण ऑनलाईन भरपूर फायदे घेऊ शकतो. गुगलचा शोध हा देखील 'गुटेनबर्ग' च्या छपाई यंत्राइतकाच क्रांतिकारक मानला पाहिजे. ऑनलाईन अभ्यासक्रमांच्या ज्ञानशाखा बहरतायेत आणि त्याला कुठलीही सीमा किंवा बंधने नाहीत.

ऑनलाईन शिक्षण पध्दतीचे अनेक फायदे आहेत. ऑनलाईन शिक्षण पध्दतीत, शैक्षणिक साहित्य प्रकाशित केल्यानंतर, लगेच जगातील सर्व विद्यार्थी त्याचा वापर सुरु करू शकतात. ऑनलाईन शिक्षणांमुळे विद्यार्थी तिप्पट वेगाने शिकतात किंवा तेवढ्याच वेळेत, तिप्पट जास्त शिकतात. विद्यार्थ्यांच्या आवडी निवडी किंवा पूर्व क्षमतेनुसार शिक्षण साहित्याच्या सादरीकरणाच्या अनुरूप बदल करण्याची क्षमता ऑनलाईन शिक्षण पध्दतीत आहे.

ऑनलाईन शिक्षण पध्दतीचे काही तोटेही आहेत. जसे की, विद्यार्थ्यांना शिकवण्याच्या चार शैली आहेत. यात बसून, ऐकून, स्पष्ट करुन आणि कृतीतून शिकण्याचा समावेश आहे. परंतु विद्यार्थी १० टक्के अनुभवातून शिकत असतो. तो अनुभव या पध्दतीमुळे घेता येत नाही. शिक्षक व विद्यार्थी या दोघांमध्ये प्रत्यक्ष संवाद होत नसल्याने अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत अनेक अडथळे येत आहेत. यातील सर्वांत मोठी समस्या म्हणजे शिक्षकांनी केलेले अध्यापन विद्यार्थ्यांना समजते की नाही याचा उलगडा होत नाही. त्यामुळे शिक्षकांना शिकवण्याचे समाधान मिळत नाही. दुसरी मोठी समस्या म्हणजे या शिक्षण पध्दतीसाठी लागणारे मोबाईल, संगणक ही साधने अनेक गरीब पालकांकडे अँड्रॉईड मोबाईल, संगणक यापैकी कोणतेही साधन नसल्यामुळे मुलांच्या मनात न्यूनगंड तयार होत आहे. ग्रामीण भागातही फार मोठी समस्या आहे. विजेच्या समस्यामुळे हे विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणापासून वंचितच राहत आहेत. तसेच मोबाईल, लॅपटॉप,

संगणकासमोर अधिक काळ बसल्यामुळे डोळ्यांचे व कानांचे विकार तसेच पाठदुखी असे आजार उद्‌भवू शकतात. विद्यार्थी अधिक काळ ऑनलाईन राहू लागल्याने पालकांची नजर चुकवून अध्यापना व्यतिरिक्त इतर आक्षेपार्ह विंडोज उघडली जाण्याची शक्यता वाढली आहे. पूर्वी ३० ते ३५ मिनिटांच्या तासात शिक्षक शैक्षणिक साधनांचा उपयोग करुन व काही उदाहरणे देऊन अध्यापन करीत असत, व्हिडीओमुळे शिक्षक काटेकोरपणे केवळ विषयावरच बोलतात. त्यामुळे रटाळपणा वाढला. वर्गमित्र-मैत्रिणींशी भेट होत नसल्याने विद्यार्थी एकलकोंडी होण्याची भीती वाढू लागली आहे.

त्यामुळे ऑफलाईन शिक्षण पध्दती ही सर्व विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकास वाढवायला मदत करते म्हणून ऑफलाईन शिक्षण चालू होणे गरजेचे आहे. विद्यार्थी हा आसपासचे जग अनुभवून भरभरून जगायला शिकण्यासाठी ऑफलाईन शिक्षण पध्दत सोयीची ठरेल आणि आपण या बदलांसाठी तयार होऊया. कुसुमाग्रजांच्याच शब्दात सांगायचे झाले तर 'अनंत आमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा, किनारा तुला पामराला!'

- कु. श्रध्दा शिंदे,
बी.एस्सी. भाग-३

## विनोद



एका प्रसिध्द दुकानावर एक पाटी लावलेली होती.
त्यावर लिहिले होते की, ''आमची इतरत्र कोठेही शाखा नाही!''
एका वात्रट मुलाने खडूने खाली लिहिले की,
''कारण हेच दुकान नीट चालत नाही.''

---

मुलगा : आई मी अभ्यास करता करता टी.व्ही. बघू का?
आई : बघ, पण टी. व्ही चालू करु नको.

---

माणूस हा एक असा येडपट प्राणी आहे,
ज्याला घरामध्ये हॉटेल सारखं जेवण हवं असतं...
आणि हॉटेलमध्ये घरगुती पध्दतीचं जेवण हवं असतं....

---

Teacher : What is the definition of a Circle ?
Student : सर्कल इज अ सर्कल
जेवढं सरकवाल तेवढं सर्कल!!



# स्पर्धा परीक्षा - एक चक्रव्यूह

कधीतरी, केव्हातरी, स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या यशस्वी उमेदवराचं भारावून टाकणारं भाषण ऐकून अनेक मुलं-मुली स्पर्धा परीक्षा द्यायचा निर्णय घेतात. आई-वडिलांची देखील आपल्या पाल्याने सरकारी नोकरी मिळवावी अशी (अ) वाजवी इच्छा अनेकांना स्पर्धा परीक्षा देण्यास भाग पाडते. या अशा साऱ्या इच्छा-अपेक्षा, आकांक्षेचं ओझं डोक्यावर घेऊन लाखो तरुण-तरुणी महानगरांमध्ये येतात - 'स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी'!

सरकारी नोकरी प्राप्त करण्यासाठीचं एक माध्यम असलेल्या स्पर्धा परीक्षा, हे सध्याचं तरुणाईचं एक नवं आकर्षण! या आकर्षणाला भुलून, बळी पडून अनेक जण या स्पर्धा परीक्षांच्या तयारीच्या पथावर चालण्याचा निर्णय घेतात. अधिकारी होण्याचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी या स्पर्धा परीक्षा देणाऱ्या तरुणाईला मोठ-मोठ्या शहरांमधील खाजगी शिकवण्या, कोचिंग क्लासेस खुणावत असतात. आपल्या स्वप्नपूर्तीसाठी कोचिंग क्लासेसमध्ये अनेकजण प्रवेश घेतात. या महानगरांमध्ये खेडेगावातून, निमशहरी भागातून आलेले विद्यार्थी या महानरांमध्ये वसतिगृह, भाड्याने फ्लॅटवर राहणे, कॉट बेसिसवर, पेईंग गेस्ट इ. अनेक राहण्याच्या प्रकारामध्ये स्थायिक होऊन जातात. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना येणाऱ्या अडचणी तर असतातच पण मुलांच्या दैनंदिन आयुष्यात संघर्षाचा नवाच अध्याय चालू होतो. घरापासून बाहेर राहिल्यामुळे खाण्याची मारामार होते. मेसचे जेवण जरी असले तरी ते शरीरासाठी पौष्टिक नसते, त्यात विविध मसाल्यांचा, तेलाचा, सोडा इ. घातक गोष्टींचा भडीमार असतो आणि हे असलं जेवण सलग ३/४ वर्ष खाण्याची वेळ ऐन तारुण्यात येते आणि त्यातून विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे अनेक प्रश्न उद्भवतात. १२-१३ तास रोजाचा अभ्यास करुन ज्ञानात तर भर पडते पण शरीराचे प्रचंड नुकसान होते. दिवसभर एका ठिकाणी बसून राहिल्याने मानेचे, पाठीचे विकार जडतात, तास न् तास मोबाईल स्क्रीन पाहिल्याने डोळ्यांना चष्मा लागतो, आणि आता कोरोनामुळे ऑनलाइन लेक्चर्स होत आहेत. तर त्या लेक्चर्ससाठी चार-चार तासात कानात इयरफोन घालून, विद्यार्थ्यांना क्लास करावा लागतो. त्यामुळे कर्णबधीरतेचे प्रमाणही वाढत आहे. अशा या अनेक गोष्टींमुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

स्पर्धा परीक्षेला विद्यार्थी जणू विश्वचं समजतात, नेहमी त्याच विश्वात ही मुलं (इच्छा नसतानाही) रममाण होतात. अनेक वर्ष बाहेर राहिल्यामुळे कुटुंबाशी संपर्क तितकासा राहत नाही. शारिरीक खच्चीकरणाबरोबर, विद्यार्थ्यांना मानसिक खच्चीकरणालाही सामोरं जावं लागतं. मोठ्या शहरात येऊन स्पर्धेचा आवाका कळतो, आपण किती मागे आहोत, आपला अभ्यास काहीच नाही हे जेव्हा सिनियर्सकडे पाहून जाणवतं, तेव्हा उरला सुरला आत्मविश्वास देखील ढळतो. अशा परिस्थितीत सहानुभूतीसाठी, जिव्हाळ्यासाठी त्यांच्या सोबत कोणीच नसतं, स्वतःच स्वतःला सावरून ही मुलं पुन्हा उसन्या स्वबळावर अभ्यासाला लागतात. त्यात बहुतांशी विद्यार्थी दिशाहिन अभ्यास करतात. तर बरेच जण केवळ अभ्यासाचं

सोंग करतात. अनेकांना कालांतराने कळतं की, या परीक्षांचा अभ्यास आपल्याकडून शक्य नाही तेव्हा ते घरच्यांच्या समाधानासाठी किंवा नातेवाईंकासमोर फक्त ‘स्पर्धा परिक्षेची तयारी करतोय/करतेय’ असं भासवतं असतात. पण सत्य परिस्थिती फार वेगळी असते. स्पर्धा परिक्षेची तयारी करणं जमणार नाही. म्हणून घरी कोणत्या तोंडाने सांगायचे, कारण आई-वडिल रागावतील. एवढ्या वर्षाचा केलेला खर्च बुडेल, नातेवाईक हिणवतील अशी अनेक नवे प्रश्न समोर असतात. म्हणून केवळ सोंग करणारे विद्यार्थी सत्य न सांगता जसं चालू आहे तसं चालू दे म्हणत, आपला मौल्यवान वेळ वाया घालवतात, हे सारं फार केविलवाणं आहे.

हे सारं पाहता, तरुणाई कुठेतरी भरकटत आहे की काय, असं वाटायला लागतं. रोजगाराच्या संधी समोर नसतील, एवढं शिक्षण घेऊनही उपजीविकेसाठी त्या घेतलेला शिक्षणाचा उपयोग नसेल किंवा अपेक्षेप्रमाणे नोकरी मिळत नसेल, नोकरी असली तरी तुरळक पगार असेल, तर स्पर्धा परीक्षा हा एकमेव उपाय दिसायला लागतो. लाखोंनी या परीक्षांसाठी अर्ज येतात, पण अर्ज करणारे खरंच तेवढ्या प्रामाणिकपणे अभ्यास करणारे असतात? किंवा परीक्षा देण्यामागे प्रत्येकाचा उद्देश काय असतो, हा नवा गूढ प्रश्न! मुळात स्पर्धा परीक्षा का द्यायच्या? ह्या प्रश्नाचं उत्तर वर्षानुवर्ष तयारी करणाऱ्या परीक्षार्थीला माहित नसेल किंवा या प्रश्नाचं वैध उत्तर, कित्येक वर्ष स्पर्धा परीक्षांचं मार्गदर्शन करणाऱ्या त्या गुरुजींना वर्गात देत येत नसेल, पण आपण नेमका कसा समाज घडवतोय, हे थोडसं धावत्या, पळत्या जीवनातून थांबून आपण स्वतःला विचारायला हवं!

स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होणारे बरेचजण असतात, पण त्याहून अधिक त्या अनुत्तीर्ण होणाऱ्या तरुणाची संख्या अधिक आहे. या उर्वरित विद्यार्थ्यांनी काय करावं, याचं उत्तर सरकारकडे ही नसेल, तर तरुणाईने काय करावं? असंच भरकटत राहणारी तरुणाई, देशाचं भवितव्य कसं घडवू शकेल. या साऱ्या प्रश्नांना, परिस्थितीला जबाबदार कोण? समाजाने विचार करुन या नवतरुणांकडे पाहिले पाहिजे, ऐन तारुण्य हे असं भरकटतं जाणं काही उपयोगाचे नाही, नाही तर स्पर्धा परीक्षांचा आभ्यास करणाऱ्या तरुणाईची अवस्था महाभारतातल्या चक्रव्यूहात फसलेल्या अभिमन्यूसारखी होईल, या साऱ्याच गोष्टीचा अंत दुःखदायक होता कामा नये!

कु. भारती साबा,
बी.ए. भाग-३



## विनोद

नवरा : तुला माहित आहे का?
काल आमचे बॉस कोमात गेले

बायको : त्याच काय बाई, पैसेवाले लोक आहेत ते.
सुट्टीत कोठेपण जातील.
आपल्या सारखं आहे का? सारखं घरात घरातच....



# मराठी भाषा संवर्धनाचे उपाय

या मातीचा गंध मराठी,
इथली ओवी, अभंग मराठी
या सृष्टीचे दान मराठी
आमचा मान, अभिमान मराठी

